
MAHMARI 19358/13/1/2000 - TC

विद्या प्रसारक मंडळ
स्थापना • नौपाडा ठाणे • १९३५



# व्ही.पी.एम्. दिशा

वर्ष बाविसावे / अंक १२ / डिसेंबर २०२१

## संपादकीय

## रामानुजन अमृत भारत गणित यात्रा

भारतीय स्वातंत्र्याचा अमृत महोत्सव सध्या देशात साजरा करण्यात येत आहे. या निमित्ताने विविध संघटनांनी वेगवेगळ्या प्रकारचे कार्यक्रम आयोजित केले आहेत. त्यातील एका अनोख्या अशा कार्यक्रमात सहभागी होण्याची मला संधी मिळाली. रामानुजन मॅथ क्लब या स्वयंसेवी संघटनेने अमृत महोत्सवाचे निमित्त साधून एक देशव्यापी गणित यात्रा आयोजित केली आहे. त्यांची सुरुवात गांधी जयंतीच्या दिवशी म्हणजे २ ऑक्टोबरला गुजरात राज्यातील सोमनाथ या प्रसिद्ध शहरापासून करण्यात आली. देशाच्या २५ राज्यांमधून जाऊन ही यात्रा २२ डिसेंबरला त्रिपुरा राज्यातील अगरताला या शहरात पोहोचणार आहे. २२ डिसेंबरला सुप्रसिद्ध भारतीय गणिती श्रीनिवास रामानुजन यांची जयंती असते. २ ऑक्टोबर ते २२ डिसेंबर या ८२ दिवसांच्या कालावधीत कमीत कमी ७५ शाळांना भेटी देण्याची योजना आखण्यात आली आहे.

डॉ. चंद्रमौली जोशी यांच्या नेतृत्वाखाली स्थापन झालेल्या एका समितीने यात्रेचे उत्तम नियोजन केले आहे. यासाठी त्यांनी रमन विज्ञान तंत्रज्ञान प्रतिष्ठान, नॅशनल कौन्सिल ऑफ टिचर सायंटिस्ट या स्वयंसेवी संघटनेची मदत घेतली. या संस्थांचे जाळे देशभर पसरले आहे. वेगवेगळ्या राज्यांमध्ये त्यांचे सभासद आहेत. त्यातून त्यांनी प्रत्येक राज्यासाठी एका समन्वयकाची नेमणूक केली. त्यांच्या राज्यात यात्रा आल्यावर यात्रेला कोणकोणत्या शाळेत न्यायचे हे ठरविण्याचे संपूर्ण अधिकार त्यांना देण्यात आले. महाराष्ट्र राज्याचे समन्वयक म्हणून वरणगाव येथील महात्मा गांधी विद्यालयाचे गणित शिक्षक सुनील वानखेडे यांची निवड करण्यात आली. आपल्या सहकार्यांच्या मदतीने त्यांनी महाराष्ट्र राज्यात १२, १३, १४ नोव्हेंबर या तीन दिवसांसाठी यात्रेचे नियोजन केले होते. त्यांचा निमंत्रणावरून मी या यात्रेचे सहभागी होऊ शकलो. तीन दिवसांत त्यांनी ५ शाळांना भेटी देण्याचा कार्यक्रम आखला होता. आयोजनाला सोयीचे व्हावे यासठी भुसावळ शहराजवळ असलेल्या शाळा त्यांनी निवडल्या होत्या.

गणित यात्रेत सुरुवातीपासून शेवटपर्यंत दोन यात्री जुळले गेले आहेत. त्यातील पहिले गृहस्थ मेहूल कुमार

(पृष्ठ क्र. २ वर)

(मुखपृष्ठावरून - **संपादकीय**)

हरसोला असून ते गुजरातच्या भावनगर शहराचे रहिवासी आहेत. त्यांनी अविवाहित राहून आपले जीवन गणिताच्या प्रसाराला वाहून घेतले आहे. वेगवेगळ्या कृतीतून ते गणितातील सिद्धांत आणि तत्त्व समजावून देतात. उदाहरणच द्यायचे झाले तर 'पाय' या राशीचे देता येईल. वर्तुळाचा आकार काहीही असला तरी परीघ आणि व्यास यांचे गुणोत्तर सतत कायम असते हे गणितातले एक मूलभूत सत्य आहे. त्याचा विद्यार्थ्यांना पडताळा घेता यावा यासाठी त्यांनी अनेक आकारांची वर्तुळे बनवून घेतली आहेत. शिंप्याकडे असते तशी टेप वापरून ते मुलांना वेगवेगळ्या वर्तुळांचे परीघ आणि व्यास मोजायला लावतात. त्यानंतर त्यांचे गुणोत्तर घ्यायला लावतात. माहिती देण्यापेक्षा माहिती कशी शोधायची हे शिकविण्याकडे त्यांचा कल असतो. कृती करून गणित शिकायला मिळत असल्याने विद्यार्थी त्यांच्या कृतीसत्रात गढून जातात.

गणित यात्रेचे दुसरे यात्रेकरू आहेत ब्रजेश दीक्षित. ते उत्तर प्रदेशातील आलेगर या गावचे रहिवासी असून ते विज्ञानाचे शिक्षक होते. निवृत्तीनंतर त्यांनी स्वतःला विज्ञान प्रसाराच्या कामाला वाहून घेतले. आपल्या सहकारी यात्रेकरू प्रमाणेच कृतीतून विज्ञान शिकविण्यावर त्यांचा भर आहे. ते वेगवेगळे विज्ञानाचे प्रयोग करून दाखवितात. आपल्या शरीराची हालचाल करताना आपण गुरूत्वमध्याची नकळतपणे काळजी घेत असतो हे साधे तत्त्व ते विद्यार्थ्यांना कृती करायला लावून समजावून देतात. तसेच परीक्षा-नळीत पाणी भरून त्यांचा भिंगासारखा उपयोग करता येतो हे ते प्रयोगाने दाखवितात. त्यांच्या सत्राला देखील अतिशय उत्तम प्रतिसाद मिळतो. त्यांनी दोन मुलांना जरी बोलाविले तरी पाचपेक्षा जास्त मुले स्टेजकडे पळत येतात.

वर सांगितल्याप्रमाणे सोमनाथ या पवित्र शहरातून यात्रेची सुरुवात झाली. त्यानंतर यात्रा राजस्थानात गेली. तिथे तीन दिवस मुक्काम केल्यानंतर यात्रा हरियाणा राज्यात शिरली. त्यानंतर दिल्ली, उत्तर प्रदेश असे करीत मध्यप्रदेशातील भोपाळ शहरात ७ नोव्हेंबरला आली. तिथून ती ११ नोव्हेंबरला महाराष्ट्र राज्यात आली. तीन दिवस (नोव्हेंबर १२ ते १४) भुसावळ शहरात मुक्काम करून १५ तारखेला यात्रेचे महाराष्ट्र राज्यातून प्रस्थान झाले. यात्रेचा यापुढचा पडाव आहे कर्नाटक राज्यातील विजापूर. त्यानंतर तेलंगणा, आंध्रप्रदेश, तामिळनाडू, ओडिशा या राज्यांना भेट देत २२ डिसेंबरला ही यात्रा त्रिपुरा राज्यातील अगरताला या शहरात पोहोचेल.

गणित यात्रेच्या ८२ दिवसांपैकी ३ दिवस महाराष्ट्राच्या वाट्याला आले. त्याचा पुरेपूर उपयोग येथील आयोजकांनी करून घेतला. तीन दिवसांत एकूण पाच शाळांना भेटी आयोजित केल्या होत्या. हे करीत असताना त्यांनी ग्रामीण शाळांना झुकते माप दिले होते. शुक्रवार दिनांक १२ नोव्हेंबर रोजी सकाळी आम्ही दीपनगर येथील श्री शारदा विद्यालयात पोहोचलो. भुसावळ शहराजवळ एक मोठे औष्णिक वीजनिर्मिती केंद्र आहे. या केंद्राच्या वसाहतीला 'दीपनगर' असे नाव दिले आहे. या नगरात आणि आजूबाजूच्या परिसरात राहणाऱ्या मुलामुलींच्या शिक्षणाची सोय व्हावी यासाठी

(पृष्ठ क्र.४० वर)

व्ही.पी.एम्.

# दिशा

विद्या प्रसारक मंडळ
स्थापना • नौपाडा ठाणे • १९३५

वर्ष बाविसावे/अंक १२/डिसेंबर २०२१

**संपादक**
डॉ. विजय बेडेकर

'दिशा' प्रारंभ जुलै १९९६
(वर्ष २६ वे/अंक ६ वा)

**कार्यालय/पत्रव्यवहार**
विद्या प्रसारक मंडळ
डॉ. बेडेकर विद्या मंदिर
नौपाडा, ठाणे - ४०० ६०२
**दूरध्वनी : २५४२ ६२७०**
**www.vpmthane.org**

**मुद्रणस्थळ :**
परफेक्ट प्रिण्टस्,
नूरीबाबा दर्गा रोड, ठाणे.
**दूरध्वनी : २५३४ १२९१
२५४१ ३५४६**
Email:perfectprints@gmail.com

## अनुक्रमणिका

| | | | |
|---|---|---|---|
| १) | संपादकीय | डॉ. सुधाकर आगरकर | |
| २) | ॐ दत्तात्रेय नमः | सहा. प्रा. सुभाष गं. शिंदे | २ |
| ३) | इंग्रजी, साहित्य आणि आपण... | डॉ. आनंद कुलकर्णी | ६ |
| ४) | वैरागडची हिऱ्याची खाण आणि २१०० वर्षापुर्वीचा रणसंग्राम | दिलीप नारायण वंडलकर | ८ |
| ५) | या गुरूकडून काहीतरी शिकू या... | किरण वसंत पुरंदरे | १० |
| ६) | परिसर वार्ता | संकलित | १२ |

या अंकात व्यक्त झालेली मते त्या लेखकांची वैयक्तिक मते असून, <u>त्या मतांशी संपादक सहमत असतीलच असे नाही</u>.

# ॐ दत्तात्रेय नमः

**(भाग-१)**

*ब्रह्मा, विष्णू व भगवान शिवाचे रूप मानल्या गेलेल्या दत्तात्रेय या देवतेविषयी माहिती देणारा लेख - संपादक*

दत्तात्रेयांच्या एका हातात आपणास कमंडलू दिसतो. कमंडलू हे पावित्र्याचे, तसेच शुद्धत्वाचे व वैराग्याचे प्रतिक आहे. हिंदू धर्मामध्ये कमंडलूचे फारच महत्त्व आहे. आजही साधू-संत मंडळी हातात कमंडलू घेऊन भ्रमण करताना व तीर्थयात्रा करताना दिसतात. मुळात कमंडलू दुधीभोपळ्याला त्यातील गर व बिया काढून टाकून बनवले जात असे. परंतु नंतरच्या काळात धातूपासून व प्रामुख्याने तांबे आणि पितळ या धातूंपासून कमंडलू बनविण्यात येऊ लागले. आजही बऱ्याचदा याच धातूंनी बनविलेले कमंडलू साधू व भक्तगण वापरताना निदर्शनास येते. कमंडलूत साधूपुरुष वा साध्वीमाता पाणी भरून ते तहान लागल्यावर प्राशन करतात. तसेच, सोयीप्रमाणे वा गरजेप्रमाणे अन्न शिजविण्यासाठी त्या पाण्याचा वापर करतात. लहानपणी मुख्यतः ग्रामीण भागात आपणापैकी अनेकांनी साधूलोक हातात कमंडलू घेऊन गावात येताना व गावात भिक्षा मागून ते अन्न तेथील मंदिरात अथवा एखाद्या वृक्षाखाली शिजवून खाताना पाहिले असेल. भाविक हिंदू, अगोदर नमूद केल्याप्रमाणे, कमंडलूतील पाण्याला फार पवित्र मानतात. त्यातील पाण्याचे आध्यात्मिकदृष्ट्या खूप महत्त्व आहे. हिंदू धर्मात अनेक देव-देवतांकडे कमंडलू असलेले निदर्शनास येते. भगवान शिवाकडे कमंडलू असलेले आपण पाहतो. भगवान शिवाच्या कमंडलूतील जल अमृतासमान मानले जाते. तसेच, हे जल शुद्ध मनाचे प्रतिक आहे. भगवान शिव नेहमी ध्यानस्थ अवस्थेत आढळतात व ध्यान केल्याने मन:शांती मिळते व ते स्थिर राहून निर्मळ होते त्याचप्रमाणे त्यांच्या कमंडलूतील जल हे शुद्ध मनाचे प्रतिक होय यात वाद नाही. ब्रह्मदेवाच्या हातात सुद्धा कमंडलू दिसते. ब्रह्मदेवाच्याच कमंडलूत गंगा नदी असे व भगिरथाने खडतर तपश्चर्या केल्यानंतर ती पृथ्वीवर येते व तिचा वेगवान प्रवाह भगवान शिव आपल्या जटांमध्ये झेलतात अशी पुराणकथा आपणास वाचावयास मिळते. दुर्गा मातेच्या हातात सुद्धा कमंडलू असते. नवरात्रोत्सवात दुर्गा मातेची नऊ वेगवेगळ्या रूपांमध्ये पूजा केली जाते. यातील एक रूप 'ब्रह्मचारिणी' हे होय. तिच्या एका हातात जपमाळ व दुसऱ्या हातात कमंडलू असते. नवरात्रींमध्ये दुर्गामातेच्या ज्या नऊ रूपांची पूजा केली जाते त्यांची नावे पुढीलप्रमाणे आहेत- शिलापुत्री, ब्रह्मचारिणी, चंद्रघंटा, कुशमंडा, स्कंदमाता, कात्यायनी, काळरात्री, महागौरी आणि सिद्धीदात्री. ब्रह्मचारिणी या रूपात पार्वती मातेने योगसाधना व तप करून भगवान शिवाला तिच्याशी विवाह करण्यासाठी प्रसन्न करून घेतले अशा स्वरूपाची पौराणिक कथा आपणास वाचावयास मिळते. नवरात्रौत्सवात दुसऱ्या दिवशी ब्रह्मचारिणीची पूजा करतात. पर्जन्यवृष्टी देणारा देव वरुण, अग्निदेव, तसेच देवांचा गुरू बृहस्पती यांचाही कमंडलूशी संबंध आहे. तर असे हे शुभत्वाचे लक्षण असणारे व अमृतरूपी पाणी ठेवण्यासाठी वापरात येणारे कमंडलू दत्तगुरुना प्रिय आहे व त्यामुळे ते त्यांच्या एका हातात दिसते. दत्तात्रेयाच्या त्रिमुर्तीतील भगवान शिव व ब्रह्मदेव हे दोन देव आहेत व त्यांचा कमंडलूशी संबंध असलेला आपण पाहिले. त्यामुळे हा कमंडलू दत्तात्रेयांचा देखील दिसतो. दत्तगुरु हे वैरागी आहेत व त्यांचा पर्वत-डोंगरदऱ्यांमध्ये मुक्त संचार असतो. दत्तात्रेयांचा

दिनक्रम पुढीलप्रमाणे असल्याचे म्हणतात- निवास- मेरू पर्वत, प्रांत:संध्या- केदारनाथ, योगाचा व्यायाम- गिरनार पर्वत, दुपारच्या वेळची विश्रांती- रैवत पर्वत, पुराण श्रवण- नैमिषारण्य व निद्रा- माहुरगड. अशाप्रकारे पर्वतराजी व वनांमध्ये वास करणाऱ्या दत्तत्रेयांना कमंडलू न लागे तर आश्चर्यच!

दत्तात्रेयांकडे असणारे एक महत्त्वाचे आयुध वा शस्त्र म्हणजे त्रिशूल हे होय. त्रिशूल हे भगवान शिवाचे शस्त्र म्हणून प्रसिद्ध आहे. त्रिशूल हे आयुध लढाईसाठी वापरण्यात येत असल्याची माहिती आपणास रामायणात देखील मिळते. रामायणात त्रिशूलाविषयी असा संदर्भ येतो की, हे शस्त्र हाताने वेगाने फिरवून प्रतिस्पर्ध्यांच्या शरिरात खुपसले जाते. रामायणाविषयी आपणास माहिती आहेच की, हे संस्कृतमध्ये लिहिलेले महाकाव्य असून यात सूर्यवंशी राजा श्रीराम व त्याच्या शुद्ध व पवित्र अशा धार्मिकतेची व नैतिकतेची कथा सांगितलेली आहे. ही फक्त श्रीरामाची कथा नाही तर भारतीय संस्कृतीचा आरसा आहे. यात मातृप्रेम, पितृप्रेम, बंधुप्रेम, आप्तेष्टांसाठी करावयाचा त्याग, एकवचनीपणा, सत्यवचनीपणा, जनताभिमुख राज्य करणे, परस्त्रीचा आदर राखणे तसेच तिच्यावर वाईट दृष्टी ठेवणे म्हणजे महापातकपणा होय, एकपत्नीत्व, एकपतीत्व, पततीव्रता आदी तत्त्वांचा सुरेख ऊहापोह करण्यात आला आहे. रामायणाचे मूळ कर्ते वाल्मीकी ऋषी असल्याचे म्हटले जाते. त्यानंतर रामायणाचे भाषांतर व त्यावरील टीका अनेक भारतीय प्रादेशिक भाषांमध्ये लिहिली गेली. मराठीतील संत एकनाथांचे भावार्थ रामायण तर प्रसिद्धच आहे. हिंदीतील गोस्वामी तुलसीदास यांचे रामायण प्रसिद्ध आहे. अन्य भाषांतील काही रामायणं व त्यांच्या कर्त्यांची नावे पुढीलप्रमाणे आहेत-

मत्स्य आणि विष्णू पुराणांतदेखील त्रिशूलाचा उल्लेख असून त्यात सूर्याच्या वैष्णव तेजाला त्वष्ट्याने कानशीवर घासून त्रिशूल बनविल्याचे म्हटल्याचे आपल्या निदर्शनास येते. मत्स्य पुराण हे हिंदूंच्या अठरा पुराणांपैकी एक व सर्वात प्राचीन पुराण आहे. मत्स्य पुराण हे नाव भगवान विष्णुच्या नऊ अवतारांपैकी मत्स्य या पहिल्या अवतारावरून देण्यात आले आहे. मत्स्य अवतारात प्रलय आल्यानंतर मनू, मानवजात, वृक्षवेली, इतर चराचर तसेच पवित्र वेदांचे रक्षण मत्स्यरूपी भगवान विष्णू करतो अशा स्वरूपाची कथा मत्स्य पुराणात आहे. जरी मत्स्य पुराण हे भगवान विष्णुच्या अवताराशी संबंधीत असले तरी यात भगवान शिव, माता शक्ती, योग तसेच हिंदू मंदिरांच्या रचनेविषयी अतिशय सुंदर माहिती दिल्याचे आढळते. त्याचप्रमाणे हिंदू धर्मातील अजून एक महत्त्वाचा साहित्य प्रकार म्हणजेच स्थळ माहात्म्य याविषयीदेखील वर्णन येते. विष्णुपुराणाविषयी म्हटले तर हे एक महापुराण असून ते भगवान विष्णुला सर्वात महान देव मानते. या पुराणाचे अजून एक वैशिष्ट्य म्हणजे हे पंचलक्षण (सर्ग, प्रतिसर्ग, वंश, मन्वंतर आणि वंशनूचरितम) लेखनपद्धतीत लिहिलेले आहे. विद्वानांच्या मते पुराणं लिहिण्याची हीच योग्य पद्धत होय. विष्णुपुराण पूर्णतः भगवान विष्णुलाच वाहिलेले असून त्याच्या श्रीकृष्ण अवताराची देखील चर्चा करते. विष्णुपुराणानुसार संपूर्ण विश्वाची उत्पत्ती भगवान विष्णुपासून झालेली आहे, विश्व भगवान विष्णुत सामावलेले आहे, तसेच या विश्वाचे पालन व वेळ आल्यावर त्याचा नाशदेखील तोच करतो. असो. तर आपण त्रिशूलासंबंधी विवेचन करत होतो. त्रिशूल दत्तात्रेय, शिव तसेच इतर अनेक देवतांच्या हातात असल्याचे दाखले आपणास काही स्तोत्रांतून मिळते. शैव पंथात तर त्रिशूलाला अनन्यसाधारण महत्त्व आहे. अभ्यासकांच्या मते बौद्ध तत्त्वज्ञातसुद्धा त्रिशूलाला महत्त्व दिलेले आहे. तर असे हे अधर्माचा नाश करणारे व ज्याचा संबंध ब्रह्ममूलाशी आहे व ज्याचा इतिहास प्राचीन सिंधू संस्कृतीपर्यंत जातो असे त्रिशूल भगवान

दत्तात्रेयाच्या हातात दिसते. हा भगवान दत्तात्रेय ही देवता भारतवर्षातील सर्वसमावेशक देवता होय याचा उत्तम पुरावा होय असे म्हणणे वावगे ठरणार नाही.

दत्तात्रेयांचे अतिशय नजरेत भरणारे वैशिष्ट्य म्हणजे त्यांच्या हातात असणारी रुद्राक्षाची जपमाळ हे होय. साधारणपणे ध्यान लावताना मुखातून देवाचे नामस्मरण करण्यासाठी जपमाळेचा वापर केला जातो. जपमाळ अशातऱ्हेने एकप्रकारे वैराग्याचे प्रतिक आहे असे म्हणणे वावगे ठरू नये. याचे कारण अनेक योगी, मुनी, तसेच भक्तगण पूर्वापारपासून नवं, मठं तसेच मंदिरांमध्ये वा एकांतात जपमाळ घेऊन देवाचे नामस्मरण करत असते नव्हे आजही करतात असे आपल्या निदर्शनास येते. जपमाळ व ध्यानस्थपणा हे एकमेकांपासून कधीच वेगळे न होणारे समीकरण होय. दत्तात्रेय हे ब्रह्म, विष्णू व शिवाचे संयुक्त अवतार मानले जातात. त्यामुळे या तिन्ही देवांकडे असणारी आयुधे, तसेच इतर गोष्टी दत्तगुरुंकडे देखील असतात याचा उल्लेख आपण अगोदर केलेलाच आहे. जपमाळेचा विचार केला तर सृष्टी व वेदांचा रचेता ब्रह्मदेव त्याचप्रमाणे नृत्य, नाट्यशास्त्र, नृत्यशास्त्र, तसेच योगाचा उद्गाता समजला जाणाऱ्या भगवान शिवाच्या हातातदेखील जपमाळ असते. भगवान शिव तर आपणास अनेकदा ध्यानस्थ स्थितीतच असतात असे आढळते. सहसा जप चालू असताना जप मोजण्यासाठी म्हणजेच जपांची संख्या मोजण्यासाठी जपमाळेचा उपयोग होतो. भारतीय परंपरेनुसार जपमाळेचे वर्णमाला, करमाला आणि मणिमाला असे तीन महत्त्वाचे प्रकार सांगितलेले आहेत. 'अ', 'आ', आणि 'क', 'च', 'ट', 'त', 'प', 'य', 'श' आदी स्वर व वर्ण (एकूण पन्नास) अनुलोम, तसेच प्रतिलोम क्रमाने मोजणे व असे करत असताना 'क्ष' ला मेरूमणी समजणे याला वर्णमाला म्हटले जाते. जप करताना जपाची संख्या मोजण्यासाठी जेव्हा हाताच्या (कर) बोटांचा वापर करतात तेव्हा त्यास 'करमाला' म्हटले जाते.

रूद्राक्षशङ्.खपद्माक्षपुत्रजीवकमौक्तिकैः।
स्फाटिकैर्मणिरत्नैश्च सुवर्णैविद्रुमैस्तथा।
राजतैः कुशमूलैश्च गृहस्थस्त्याक्षमालिका।।
माले माले महामाले सर्वतत्वस्वरूपिणि ।
चतुर्वर्गस्त्वयि न्यस्तस्तस्मान्मे सिद्धिदा भव ।

जप करण्याची कारणे वेगवेगळी असू शकतात. त्याप्रमाणे आपल्या इच्छापूर्तीसाठी वेगवेगळ्या स्वरूपाची जपमाळ घ्यावी असे सांगितले जाते. साधारणतः वा शक्यतो रुद्राक्ष, शंख, पद्माक्ष, मोती, स्फटिक, मणी, रत्न, सुवर्ण, पोवळे व दर्भमूळ इत्यादींच्या मण्यांपासून बनविलेली जपमाळ सर्वसाधारण व्यक्तीने वापरावी असे म्हटले जाते. जप करण्याचा मुख्य हेतू देवाचे नामस्मरण करून दिव्यानंद प्राप्त करणे व ध्यानस्थ अवस्थेत जाऊन परमानंद व चित्तशांती मिळविणे हा असला तरी मनुष्याच्या विविध इच्छा पूर्ण व्हाव्यात यासाठी वेगवेगळ्या मण्यांच्या जपमाला वापराव्यात असे हिंदू धर्मात सांगितलेले आहे. अशाच वेगवेगळ्या इच्छा व त्यांची पूर्ती होण्यासाठी वापरावयाच्या जपमाळा पुढीलप्रमाणे आहेत- त्रिपुरादेवीला प्रसन्न करण्यासाठी- रक्तचंदनाची माळ, मनीचे मनोरथ पूर्ण होण्यासाठी- रुप्याच्या मण्यांची जपमाळ, पुत्र व्हावा यासाठी पुत्रजीव वृक्षाच्या फळांची जपमाळ, पाप नाश करण्यासाठी कुशग्रंथींची जपमाळ, शत्रूचा नाश करण्यासाठी पद्माक्षाची जपमाळ, सूर्यासाठी स्फटिकांची जपमाळ, शक्तीसाठी मोत्यांची (पोवळ्यांची) जपमाळ, धनप्राप्तीसाठीदेखील पोवळ्यांची माळ, भगवान विष्णुसाठी तुलसीच्या मण्यांची माळ (तुलसी भगवान विष्णुला प्रिय आहे. त्यामुळेच भगवान विष्णुच्या पूजेत अनेकदा तुलसी वाहिली जाते. त्याचप्रमाणे महाराष्ट्रातील वारकरी संप्रदायातील भक्तगणांना तुलसीमाळ गळ्यात घालणे फार आवडते. वारकरी संप्रदायाचे अनुयायी भगवन विष्णुचे रूप असलेल्या विठ्ठलाची (विठोबा) पूजा व भक्ती करतात. तुलसी व भगवान विष्णुशी संबंधीत एक पौराणिक कथा आहे, ती अशी की,

जालंदर नामक एक असूर असतो व त्याच्या पत्नीचे नाव वृंदा असे असते. त्याने तिन्ही जगतांना त्रस्त करून सोडलेले असते. त्याच्या अपार शक्तीचे कारण त्याची पत्नी वृंदा हिचे पातिव्रत्य असते. तिच्या पातिव्रत्याच्याच बळावर जालंदर असूर अजिंक्य वा अजेय झालेला असतो. त्यामुळे देवांच्या विनंतीवरून भगवान विष्णू जालंदरचे रूप घेतात व वृंदेचे पातिव्रत्य भंग करतात. त्यामुळे जालंदर दैत्याची शक्ती आपसूकच नष्ट होते व भगवान शिव युद्धात त्याचा पराभव करतात. वृंदेला जेव्हा हे कळते तेव्हा ती भगवान विष्णुला शाप देते की, तू कपटाने माझे पातिव्रत्य भंग केल्यामुळे तुलादेखील पत्नी विरह होईल व तू कृष्णवर्णीय (काळा-शाळीग्राम) होशील. त्याप्रमाणे भगवान विष्णू श्रीरामाच्या रूपाने सातवा अवतार घेतात व या अवतारात त्यांना चौदा वर्षे वनवास भोगावा लागतो. तसेच त्यांना आपली प्रिय पत्नी सीता (लक्ष्मी मातेचा अवतार) विरह सहन करावा लागतो. भगवान विष्णुला शाप देऊन वृंदा सती जाते व अमरत्वाचे वरदान असलेली तुलसी बनते आणि तिच्या इच्छेनुसार वा प्रार्थनेनुसार तिचा तुलसी रूपात भगवान विष्णुशी विवाह होतो. असे म्हटले जाते की, तेव्हापासूनच भगवान विष्णुला पूजेत तुलसी वाहण्याची व भगवान विष्णू व तुलसीचा विवाह लावण्याची प्रथा पडली. साधारणपणे प्रबोधिनी एकादशी वा या एकादशीच्या दुसऱ्या दिवशी तुलसीचा भगवान विष्णुच्या श्रीकृष्ण या अवताराशी विवाह लावला जातो. या दिवशी भाविक हिंदू उपवास करतात. तुलसी विवाह मंदिर वा घरातदेखील लावला जातो. काही भक्तगण तुलसी विवाह लावण्यासाठी भटजींनादेखील बोलावतात. ज्यांना अपत्य नसते त्यांच्याकरिता या विवाहाचे महत्त्व अनन्यसाधारण आहे कारण ते तुलसीरुपी कन्येचे कन्यादान करतात. तुलसी विवाह संपन्न झाल्यानंतर घरात गोडधोड करून खाण्याची व आनंद व्यक्त करण्याची प्रथा आहे. असो. तर आपला मुळ मुद्दा होता की, भगवान विष्णुला व त्यांच्या भक्तांना तुलसीमाळ प्रिय आहे, गणपतीला हस्तीदंताची माळ (आपणास ठाऊकच आहे की, भगवान शिवाने क्रोधीत होऊन गणेशाचे मुंडके त्रिशूलाने वेगळे केलेले असते व पार्वतीमातेला पुत्राचे शिर धडावेगळे झाल्यामुळे दुःख होते. त्यावेळेस भगवान शिव गणेशाला गजमुख लावतात व त्याला शुद्धीवर आणतात. त्यामुळेच गणेशाला हस्तीदंताच्या जपमाळेचा मान आहे असे म्हणणे वावगे ठरणार नाही), ताराविद्येच्या प्रसादासाठी शंखांची जपमाळ, लक्ष्मीमातेसाठी सोन्याच्या मण्यांची माळ, भगवान शिवासाठी रुद्राक्षांची माळ तर ब्रह्मदेवासाठी मोत्यांच्या माळीचा मान असतो.


जपमाळेचे एक वैशिष्ट्य म्हणजे जगातील बौद्ध, जैन, ख्रिस्त, तसेच इस्लाम अशा महत्त्वाच्या धर्मांमध्ये जपमाळ वापरली जाते. बौद्धांमध्ये प्रामुख्याने तिबेटी बौद्ध जपमाळीचा वापर प्रकर्षाने करताना आढळतात. बौद्ध धर्मियांच्या जपमाळेत साधारणपणे एकशेआठ मणी असतात. रोमन कॅथलिक पंथाचे बांधव माता मेरीची (येशू ख्रिस्ताची माता) जपमाळ वापरताना आढळतात. मुस्लिमांच्या जपमाळेला सुभा असे म्हणतात व या जपमाळेत साधारणपणे शंभर मणी असतात. अशाप्रकारे भगवान दत्तात्रेयांकडे मनाला स्थिर करून एकाग्रचित्त करणारी जपमाळ असते. सर्वात महत्त्वाचे म्हणजे त्यांच्या भक्तांमध्ये मुस्लिमांचा देखील समावेश आहे. उदाहरणच द्यावयाचे झाले तर दत्तात्रेयांचे निद्रास्थान असलेल्या माहूर येथे शेख फरीदांचा दर्गा आहे. हे शेख फरीद महान दत्तभक्त होते. त्यामुळे माहूरला तीर्थयात्रेला जाणारे भक्त शेख फरीदांचे आवर्जून दर्शन घेतात. (क्रमशः)

**- सहा. प्राध्यापक सुभाष गं. शिंदे**
उपप्राचार्य व इतिहासविभाग प्रमुख
जोशी-बेडेकर महाविद्यालय, ठाणे.
भ्रमणध्वनी : ९८२०३२८२२६
Email : subhashinscotland@gmail.com

# इंग्रजी, साहित्य आणि आपण...

*साहित्याच्या वाचनातून भाषा समृद्ध होते इंग्रजी साहित्याच्या व्यास संगा बद्दल व साहित्य अभिरुची बद्दल डॉ. आनंद कुलकर्णी यांनी प्रस्तुत लेखात प्रकाश टाकला आहे – संपादक*

सुंदर इंग्रजी साहित्याच्या वाचन आणि अभ्यासातूनचं येते असा माझा स्वत:चा अनुभव आहे. इंग्रजीच्या प्राध्यापकांची इंग्रजी अप्रतिम असली पाहिजे असं माझं नुसतं मत नाही तर आग्रह आहे. अर्थात आपली इंग्रजी फार भारी आहे असं इतरांवर इंमप्रेशन मारणे किंवा मिरवणे अशा फुटकळ कारणांसाठी आपल्याला इंग्रजी नको. एकतर आपला विषय म्हणून ती आपल्याला अवगत असली पाहिजे आणि दुसरं म्हणजे आपले विचार सशक्तपणे व्यक्त करण्यासाठी. भाषेवर प्रभुत्व नको, प्रेम हवं. प्रभुत्व इतरांवर सत्ता गाजवण्याकडे घेऊन जातं. प्रेम असेल तर संवाद होईल आणि संवाद असेल तर विचारांची देवाणघेवाण होईल. शिवाय आपल्याला इंग्रजी कोर्सेसमधून येणारी औपचारिक किंवा बिझिनेस इंग्रजीमधून येणारी शिष्टाचाराची कृत्रिम इंग्रजी नको. चटपटीत, चमकदार, कृत्रिम, आकर्षक, उथळ इंग्रजी नको. आपल्याला आशयसंपन्न, वजनदार, सूचकं आणि सुंदर इंग्रजी हवी आहे. ती अशीच येणार नाही. त्यासाठी कष्ट घ्यावे लागतील. अशी संपन्न इंग्रजी इंग्रजीतील दर्जेदार पुस्तकं वाचून, अभ्यासूनच येईल. आपण कथा, कविता, कादंबऱ्या, नाटकं, जीवनचरित्रं, आत्मचरित्र, संस्मरणं, लेखकांचे पत्रव्यवहार अशी मुळ पुस्तकं वाचायला पाहिजे. त्यांच्यावरचे गाईडस नको, गुगलवरील सारांश नको. मूळ पुस्तकांच्या वाचनाने शब्दसंग्रह वाढतो, वाक्यरचना कळतात, आशय लक्षात येतो. भाषा समृद्ध होण्याबरोबर साहित्याविषयीची समज वाढते. मी अशा इंग्रजीला थेटपणे अकादमिक इंग्रजी म्हणणार नाही. कारण त्यात आविर्भाव आणि कोरडेपणा येईल. पण आपला विषय आणि पेशा यांना संयुक्तिक अशी इंग्रजी हवी. आपली इंग्रजी सुश्राव्य, खळाळणारी, सूचक हवी. वाचक/श्रोत्यांवर चढा हल्ला करणारी नको. आपल्याला भाषिक हुकमत गाजवायची नाही, संवाद साधायचाय. त्याला अनुरुप भाषा हवी. त्यासाठी तुम्ही तुमच्या आवडीच्या




मोठी साम्राज्ये फक्त मेहनतीनेच स्थापित होतात, कारणांनी नाही!!!

मूळ साहित्यकृती वाचा. त्याशिवाय मी तुम्हाला खालील पुस्तके सूचवतोय. इंग्रजीच्या प्राध्यापकांनी एका टप्प्यावर (आता कोणत्या टप्प्यावर ते ज्याचं त्यानं ठरवावं) अशी पुस्तकं वाचलीचं पाहिजेत.

खालील पुस्तकं साहित्य, भाषा, लेखक-वाचक, इतिहासलेखन आणि अर्थनिर्णयन अशा विषयांची अतिशय मूलगामी चिकित्सा करतात.

अब्राम्सचं Natural Supernaturalism हे मला तरी रोमँटिसीझमवरचं सर्वोत्तम पुस्तक वाटतं. त्याच्या The Mirror and the Lamp पेक्षा सखोल आणि मूलभूत मांडणी असलेलं हे पुस्तक. सर्व रोमँटीक कवींमधे अंत:स्थ संगती आहे आणि त्यांचे क्रांतिकारी विचार म्हणजे धार्मिक मतांचं निधर्मीकरण आहे असा विचार अब्राम्स यांत मांडतो.

ब्लूम त्याच्या The Anxiety of Influence मधे कोणताही कवी त्याच्या पूर्वसुरींच्या प्रभावापासून मुक्त होवू शकत नाही असं सांगतो.

बूथ त्याच्या The Rhetoric of Fiction मधे साहित्य अभ्यासाच्या अमूर्त संकल्पना मांडत नाही तर विश्लेषण कसं करावं याची पद्धत मांडतो. त्यात लेखक, वाचक, संहिता सगळेच आले. त्यांच्यातील अंत:प्रवाहांचं तो विश्लेषण करतो आणि साहित्याचा अभ्यास खऱ्या अर्थाने अनेकांगी (pluralistic) असतो हे दाखवतो.

हेडन व्हाईटची दोन्ही पुस्तकं वेगळी मांडणी असलेली. Metahistory मधे व्हाईट इतिहासलेखनाची चिकित्सा करतो. इतिहासाचं लेखन हे तथ्यांचं/वास्तवाचं वर्णन करत नाही तर तथ्य/वास्तव निर्माण करतं अशी धक्कादायक पण प्रभावी मांडणी यांत आहेत. The Content and the Form मधे व्हाईट इतिहासलेखन आणि कथनात्मकता यांच्यातील संबंधांची चर्चा करतो.

सुझान सॉन्टागचं Against Interpretation म्हणजे मूलगामी विश्लेषणाचा अविश्वसनीय नमुना. फ्रेडरीश नीत्शे सारखी तिची चिकित्सा अपारंपारिक आहे. साहित्यकृतीचं अर्थनिर्णयन धोकादायक असतं अशी सॉन्टागची मांडणी आहे. तिच्या शब्दांत:

Interpretation is a radical strategy for conserving an old text, which is thought too precious to repudiate, by revamping it. The interpreter, without actually erasing or rewriting the text, is altering it. But he can't admit to doing this. He claims to be only making it intelligible, by disclosing its true meaning.

अशी पुस्तकं आपल्या जाणिवा खोल करतात, आशयघन म्हणजे काय ते दाखवतात आणि आपला दृष्टीकोण व्यापक आणि विविधांगी करतात. शिवाय आपली इंग्रजी उत्तम करतात हेही आलंच. सर्वांना वाचनासाठी शुभेच्छा!!

1) M. H. Abrams. Natural Supernaturalism: Tradition and Revolution in Romantic Literature. 1971

2) Harold Bloom. The anxiety of Influence. 1973

3) Wayne C. Booth. The Rhetoric of Fiction. 1961

4) Hayden White. Metahistory: The Historical Imagination in Nineteenth-century Europe. 1963

5) Hayden White. The Content of the Form. 1987

6) Susan Sontag. Against Interpretation. 1966

**- डॉ. आनंद कुलकर्णी**
इंग्रजी विभाग प्रमुख
ग्रामोन्नती मंडळाचे कला विज्ञान व वाणिज्य
महाविद्यालय, वारुलवाडी, नारायणगाव,
ता. जुन्नर, जि. पुणे- ४१०५०४

•••

# वैरागडची हिऱ्याची खाण आणि २१०० वर्षांपूर्वीचा रणसंग्राम

*विदर्भातील गडचिरोतील जिल्ह्यातील वैरागड येथील हिऱ्याच्या खाणीच्या स्वामित्वासाठी सातवाहन राजा सप्तकर्णी आणि कलिंग देशाचा राजा खारवेल ह्यांच्यात तुंबळ युद्ध झाले त्याचा परिमार्श या लेखात आलेला आहे - संपादक*

काळ सुमारे २१०० वर्षांपूर्वीचा. विदर्भात त्यावेळी सातकर्णी हा महापराक्रमी सातवाहन राजा राज्य करीत होता. त्याच्या राज्याची सीमा पूर्वेला भंडारा जिल्ह्यातील पवनी पासून पश्चिमेला उस्मानाबाद जिल्ह्यातील तेर या गांवांपर्यत विस्तारली होती. या राजाने इ.स. ७८ मध्ये शक राजा क्षत्रप याचा नाशिकच्या परिसरात पराभव केला आणि स्वत:चे शालिवाहन शक सुरू केला. अशा या शककर्त्या, पराक्रमी राजाच्या काळात नागपूरजवळ कव्व्हवेण्णेच्या तीरी एक घनघोर रणसंग्राम झाला. (कव्व्हवेण्णा म्हणजे कन्हान व वैनगंगेच्या संगमानंतर वाहणारी नदी असल्याचे इतिहास तज्ज्ञांनी स्पष्ट केले आहे. त्याकाळीचे उल्लेख व आताच्या गावांची, नद्यांची नांवे वेगळी असली आणि अपभ्रंश होऊन बदलली असली तरीही त्यांचा शोध घेऊन आताचा त्याचा संबंध शास्त्रीय पद्धतीने समोर आणलेला आहे.) याचा उल्लेख ओडिशातील जगन्नाथपुरी जिल्ह्यातील हाथीगुंफा येथील खंडगिरी व उदयगिरी पर्वतातील गुहांमध्ये शिलालेखांवर कोरलेला आढळतो. या शिलालेखांचा शोध १८२५ साली स्टलिंग नांवाच्या इंग्रज अधिकाऱ्याने लावला. सातकर्णीच्या सातवाहन राज्यावर आक्रमण करणारा खारवेल हा कलिंग देशाचा राजा होता. सतरा ओळींच्या शिलालेखानुसार खारवेलाने लिहून ठेवले होते की, ''मी माझ्या राज्यकारभाराच्या दुसऱ्या वर्षी कव्व्हवेण्णा नदीपर्यंत जाऊन तेथील सातकर्णीच्या राज्यावर आक्रमण केले. माझे सैन्य चतुरस्र होते. त्यात हत्ती, घोडे, पदाती, रथ यांचा समावेश होता.' यात त्याने असितनगर म्हणजे नागपूर जिल्ह्याच्या उमरेड तालुक्यातील अडम या गावावरील हल्ल्याचा उल्लेख आढळतो. ''तेथील गावकरी माझ्या आक्रमणाने भयभीत झाले'' असे खारवेल म्हणतो.

या रणसंग्रमात दोन्ही बाजूचे सैन्य तुल्यबळ असल्याने दोघांनीही अखेर माघार घेतली.

पुन्हा दोन वर्षांनी खारवेलाने आक्रमण केले, असा तज्ज्ञांचा दावा आहे. पण खारवेलाला बलाढ्य सप्तपर्णीशी भिण्याचे कारण काय असू शकते? त्यासाठी खारवेलाच्या आधी कलिंग मध्ये काय घडले ते पाहू. चक्रवर्ती सम्राट देवानांप्रिय अशोकाने (२६९ ते २३२ बीसी) कलिंग राज्यावर चढाई केली. युद्धात झालेला नरसंहार, उद्‌भवलेली परिस्थिती यामुळे झालेले विचलित मन व त्यानंतर त्याचा बुद्ध धर्माच्या स्वीकार ही गोष्ट बहुतेकांना ज्ञात आहे. त्याकाळी कलिंग देशातील नागरिक जगन्नाथाला राजा मानून लोकसत्ताक पद्धतीने राज्यकारभार बघत होते. कलिंग अतिशय समृद्ध राज्य होते आणि ही समृद्धी त्यांनी मिळविली होती समुद्रापारच्या व्यापाराने. अशोकाच्या कलिंगवरील चढाईने व त्यानंतरच्या पराभवाने कलिंगवासियांचा अभिमान दुखावला गेला. कलिंग साम्राज्याच्या कीर्तीला ग्रहण लागले. तेव्हा तेथील जनतेने परत समृद्ध, सुखी, पराक्रमी कलिंग राज्याचे स्वप्न बघितले आणि ते खरे होण्यासाठी प्रयत्न केलेत. त्यातून पुढे लवकरच खारवेलासारख्या प्रतापी राजाचा उदय झाला. या पठ्ठ्याने सुसज्जित सैन्य

उभे केले आणि आंध्रप्रदेश, बंगाल, बिहार, उत्तरप्रदेश, छत्तिसगढ एवढा विस्तीर्ण प्रदेश जिंकून घेतला.

म्हणजे पूर्वेकडे खारवेल आणि पश्चिमेकडे सातकर्णी असे दोन बलाढ्य राजे एकाच वेळी राज्य करीत होते. त्या दोन राज्यांची सीमा म्हणजे वैनगंगा नदी. या नदीचा पूर्वे पलीकडला भाग अनेक खनिजांनी समृद्ध आहे. एवढेच नव्हे तर जि. गडचिरोली, तह. आरमोरी येथील वैरागड इथे हिऱ्याची खाण सुद्धा होती. ही खाण पंधराव्या शतकापर्यंत कार्यरत होती. हे गांव आरमोरी पासून सुमारे १४ कि.मी. अंतरावर पूर्वेला खोब्रागडी आणि सती नदीच्या संगमावर वसलेले प्राचीन नगर आहे. गावाला लागून अंदाजे दहा एकरात पुरातन किल्ला आहे. हिऱ्याच्या खाणीस संस्कृतमध्ये 'वज्रघर ' म्हटले जाते. या वरून या स्थानाला 'वजीरगड/वैरागड' असे नांव पडले.

या वैरागड परगण्याची राजकुमारी 'घुसीता' ही खारवेलची राणी होती. किंबहुना, खारवेलाच्या आक्रमणाने व पराक्रमाने भांबावलेल्या वैरागडच्या राजाने आपली मुलगी त्याला देऊन खारवेलाशी सख्य केले असावे. असो, वैरागडची 'हिऱ्याची खाण' हेच खारवेलच्या स्वारीचे मुख्य कारण असावे. पुढे त्याने बाजूच्या पवनी व आसपासच्या मुलूखावर हल्ला केला. हे ठाणे सोने, चांदी, हिरे-माणके यांच्या दागिन्यांसाठी व शस्त्रांसाठी प्रसिद्ध होते. जगभरात या वस्तूंची निर्यात होत असे. सम्राट अशोकाने बौद्ध धर्म स्वीकारल्यानंतर इथे भव्य स्तुप बांधून गुरूकुलाची स्थापना केली. या गुरूकुलातून तयार झालेले शिष्य (भिख्खू) दीक्षा घेतल्यानंतर प्रचारासाठी मुख्यत: पश्चिम व दक्षिण दिशेस जात. नाशिकला पांडवलेण्यातील शिलालेखावरून ही बाब स्पष्ट होते. तेव्हा पवनीवरील हल्ला हा सम्राट अशोकावर काढलेला रागसुद्धा असू शकतो.

पवनीवरील हल्ल्यामुळे सातकर्णी आणि खारवेल यांच्यात कव्व्हवेण्णेच्या तीरावर युद्धाची ठिणगी पडली. दोघेही पराक्रमी. त्यामुळे तुंबळ युद्ध झाले. दोन्हीकडे तुल्यबळ सेना असल्याने त्यांनी हे युद्ध आटोपते घेतले.

काळ पुढे सरकला. जुनी साम्राज्ये जावून नवीन उदयास आलीत आणि अस्तंगतही झालीत. पण हिऱ्याच्या खाणीसाठी वैरागडवर हल्ले होण्याचे सत्र काही थांबले नाही. नवव्या शतका पासून १४५० इ.स. पर्यंत इथे नागवंशीय माना जमातीची सत्ता होती. त्यांच्याच काळात इथे किल्ला बांधण्यात आला. १४७१ मध्ये अचलपूरचा बहामती सुल्तान महमदशहात तिसरा ह्याचा सरदार युसूफ आदिलखानाने या स्वारीच्या वेळी वैरागडवर स्वारी केली. हिऱ्याची खाण सुरू होती सुमारे सहा महिने पर्यंत  हे युद्ध सुरू होते. या युद्धात किल्ल्याची बरीच पडझड झाली. नंतर इ.स. १५४६ मध्ये रतनपुरचा दैदय वंशीय राजा कल्याण सहाय याने किल्ल्यावर स्वारी करून ताब्यात घेतला. त्यावेळी त्याच्या मांडलिकत्वाखाली गोंड राजा कर्णशहा राज्य करीत होता. नंतर चंद्रपूर -बल्लारपूरचा गोंड राजा बाबाजी बल्लाळशहाने हे मांडलिकत्व झुगारून दिले आणि टिपागडचा राजा पुरमशहा याच्या मदतीने उठाव करून हा किल्ला आपल्या ताब्यात घेतला. त्यानंतर त्याने १५५२ साली या किल्ल्याची डागडुजी केली. टिपागडचा राजा पुरमशहाच्या मृत्युनंतर त्याचा सेनापती हरिश्चंद्र गोंड याला किल्लेदार म्हणून नेमले. त्याने तिथे बरीच सुधारणा केली आणि मंडारेश्वर, नंदीकेश्वर, पाताळेश्वर, डुबळेश्वर, अंचलेश्वर, रामेश्वर व महाबळेश्वर ह्या सात धामांची स्थापना केली. ती गावाच्या दक्षिणेस उंच टेकडीवर आहे.

गोरजाईचा डोह याच ठिकाणी खोब्रागडी नदीवर आहे. तो अतिशय सुंदर आहे. वैरागड किल्ल्याच्या


(पृष्ठ क्र.११ वर)

माणूस जेवढा आजाराने थकत नाही, त्यापेक्षा जास्त विचाराने थकतो!


# या गुरूंकडून काहीतरी शिकू या...

*ज्येष्ठ पर्यावरण तज्ज्ञ किरण पुरंदरे यांचा विशेष लेख- संपादक*

शुक्रवार दिनांक ३ सप्टेंबर २०२१ रोजी सकाळी पिटेझरी (तालुका साकोली, जिल्हा भंडारा) या गावातलं माझं घर ते खांबा वनसंरक्षण कुटी आणि परत असा पायी फिरलो. जाताना, सकाळी बरोबर ८.४६ वाजता डांबरी रस्त्यावर तिरंगी प्रतल (Tricolour Pied Flat) *Coladenia indrani* (Moore, 1865) हे Hesperiidae या कुलातलं एक सुंदर फुलपाखरू दिसलं. ते डांबरी रस्त्यावर पडलेल्या पक्ष्याच्या विष्ठेवर उतरलं होतं. पक्ष्याची विष्ठा ऊन्हामुळे कोरडी पडलेली होती आणि पसरलेली होती. त्यामुळे हे फुलपाखरू त्याच्या शरीरात असलेलं जास्तीचं पाणी विष्ठेवर सोडून सोंडेनं कालवत होतं. नंतर विष्ठेतले उपयुक्त अन्नघटक शोषून घेत होतं. हे करत असताना, ते इतकं गुंग झालं होतं की, त्याला कशाचंच भान राहिलं नव्हतं. या रस्त्यावर वाहतूक खूपच कमी होती. मी जवळ जाऊन खाली वाकून मोबाईल कॅमेऱ्यानं त्याचे फोटो काढले. तरीही ते उडालं नाही. फोटो काढून झाल्यावर मात्र ते उडालं. त्याच वेळी, एक चारचाकी गाडी समोरून भरधाव येत होती. निसर्गाची कमाल बघा! कुण्या पक्ष्याची विष्ठासुद्धा एका चिमुकल्या जिवाच्या उपयोगी पडत होती. निसर्गात काहीही वाया जात नाही.



**पक्ष्याच्या विष्ठेतील उपयुक्त अन्नघटक शोषून घेणारं तिरंगी प्रतल**




**माझ्या अंगठ्यावर असलेल्या घामातील क्षार शोषून घेणारं कवडा [Common Pierrot *Castalius rosimon* (Fabricius, 1775)]**

हे फुलपाखरू मी नागझिरा आणि परिसरातील माझ्या वास्तव्यात पहिल्यांदाच पहात असलेल्या या फुलपाखराच्या सुखद भेटीनंतर, पुढे काही अंतरावर वाहनाच्या चाकाखाली चिरडून मेलेली एक सापसुरळी (Skink) दिसली. तिला बऱ्याच मुंग्या लागल्या होत्या. रस्त्याच्या कडेला असलेल्या गवता-झुडपांमधून मुंग्यांची एक शिस्तबद्ध रांग सापसुरळीला चिकटलेल्या मुंग्यांच्या मोठ्या गटामध्ये सामील होत होती. या मुंग्या काळ्या रंगाच्या होत्या. त्या वेगवान हालचाली करत होत्या. मुंग्यांच्या या गटातील एका छोट्या उपगटानं सापसुरळीच्या पोटाचं मांस ओढून बाहेर काढलं होतं. या रस्त्यावरून एका वेळेस एक चारचाकी गाडी धावत गेली तर प्रश्न नव्हता. मेलेली सापसुरळी गाडीच्या चाकांच्या टप्प्याच्या बाहेर पडलेली होती. मात्र, नेमक्या मेलेल्या सापसुरळीच्या जागेपाशी दोन चारचाकी गाड्या एकमेकींना ओलांडून गेल्या असत्या तर काही सेकंदांमध्ये किमान तीन-चारशे मुंग्या चिरडून मेल्या असत्या. म्हणून मी जोरात फुंकर मारून मुंग्यांना बाजूला केलं. पण तरीही काही

मुंग्या सापसुरळीला चिकटून राहिल्या होत्या. म्हणून मी एक काडी घेतली आणि एकही मुंगी मरणार नाही अशा बेतानं सापसुरळी रस्त्याच्या कडेला ढकलली. त्यावेळी मुंग्यांमध्ये एकदम कालवा झाला. एकच गोंधळ उडाला. पण फार लवकर जवळजवळ सगळ्या मुंग्यांनी नवीन जागेवर पडलेल्या सापसुरळीला पुन्हा आपलं लक्ष्य बनवलं. याच रस्त्यावरून परत येताना एक खूण म्हणून ठेवलेल्या दगडापाशी येऊन मी मुद्दाम थांबलो. पाहिलं, तर जवळजवळ सगळ्या मुंग्या सापसुरळीचं भोजन करत होत्या. आता बोटावर मोजण्याएवढ्या मुंग्या रस्त्यावर दिसत होत्या. त्याही अगदी कडेला. निसर्गात पुनर्वापराचं मोलाचं काम करणाऱ्या चिमुकल्या फुलपाखराला आणि पिटुकल्या मांसभक्षक मुंग्यांना माझा सलाम!



**सापसुरळीला लागलेल्या मांसभक्षक मुंग्या**

बाय द वे, एकट्या मुंबईत दररोज सुमारे ७०२५ टन घन कचरा तयार होतो, तर पुण्यात दररोज सुमारे १७०० टन. हे आपलं सहज माहितीसाठी म्हणून!

**– किरण वसंत पुरंदरे**
मोबाईल नं. ९७६५८१८८२५

•••

(पृष्ठ क्र. ९ वरून - **वैरागडची हिऱ्याची खाण आणि २१०० वर्षांपूर्वीचा रणसंग्राम)**

सभोवताल खोल खंडक असून बुरुजांची उंची १० ते २० फूट आहे. या किल्ल्याचे मुख्य प्रवेशद्वार दक्षिणेस आहे. या किल्ल्यात प्रवेश करतांना तीन दरवाजांतून जावे लागते. किल्ल्याच्या आत एक विहीर आहे. ती आज पूर्ण बुजलेल्या अवस्थेत आहे. या विहिरीचे बारकाईने निरिक्षण केल्यास त्यात एक गुप्त (भुयारी) रस्ता असल्याचे निदर्शनास येते. विहिरीच्या बांधकामावरून व त्यातील पायऱ्यांवरून ती नवव्या शतकात बांधलेली असावी असे इतिहासकार लिहितात. उत्तरेकडे थोडे समोर गेल्यास सिंहासन सजावट मंडप दिसून येतो. सद्या तो पडक्या अवस्थेत आहे.

काही असो पैठण, तेर, पवनी अडम वा वैरागड अशी कितीतरी गांव सद्याच्या शहरी विकासात झाकोळलेली गेली असली तरी या गावांनी कधी राजधानी किंवा संपन्नतेची बिरुदे मिरविली आहेत. मात्र त्यांची खरी ओळख आता धूसर होत आहे. आज गावांच्या प्राचीन संपन्नतेवर काजळी आली असली तरीही ऐतिहासिक दस्ताऐवजांत त्यांच्या समृद्ध परंपरेची माहिती कोरली गेली आहे.

**– दिलीप नारायण वंडलकर**
४, नरकेसरी सोसायटी,
उज्वल नगर,
नागपूर – ४४००२५
मो. नं. ९८३४६३६६५५
ई मेल wandalkardilip@gmail.com

•••

काही स्वप्नं वयावर नाही तर जिद्दीवर अवलंबून असतात!

# परिसर वार्ता

**- संकलित**

## डॉ. बेडेकर विद्या मंदिर, माध्यमिक विभाग

### दि. ६/९/२०२१ शिक्षक दिन

इ. १० वी अच्या विद्यार्थ्यांनी दि. ६/९/२०२१ रोजी 'शिक्षक दिन' ऑनलाईन पद्धतीने साजरा केला. या कार्यक्रमाचे वैशिष्ट्य म्हणजे विद्यार्थ्यांनी शिक्षकांची भूमिका करून ऑनलाईन तासिका घेतल्यात. सदर कार्यक्रमासाठी श्री. जाधव व सौ. सुमिता माने यांनी मार्गदर्शन केले. श्री. दिघे, सौ. साधना जोशी, श्री. शेलवले इ. शिक्षकही ऑनलाईन होते.

### दि. १७/१०/२०२१ अभिनंदन

भारत विकास परिषद वसंत विहार, ठाणे शाखे तर्फे प्रश्नमंजुषा व गायन स्पर्धा घेण्यात आली. यातील प्रश्नमंजुषा स्पर्धेत इ. ९ अ मधील यश जगदाळे यास तृतीय क्रमांकाचे पारितोषिक प्राप्त झाले.

तसेच इ. ९ ब मधील श्रेया इंगळे व ८ अ मधील मृण्मयी भोसले आणि इ. ९ क मधील धनश्री गावडे या विद्यार्थिनींना प्रश्नमंजुषा व गायन स्पर्धेत सहभागी प्रमाणपत्र प्राप्त झाले.

सर्वांचे हार्दिक अभिनंदन!

### दि. ३० ऑक्टोबर सतर्कता जागरुकता सप्ताह

दि. २६ ऑक्टोबर ते १ नोव्हेंबर २०२१ स्वतंत्र भारत @ 75 सत्यनिष्ठ से आत्मनिर्भरता अंतर्गत बँक ऑफ महाराष्ट्र, नौपाडा, ठाणे तर्फे आयोजित चित्रकला स्पर्धा इ. ७ वी साठी व इ. ९ वी साठी वक्तृत्व स्पर्धा घेण्यात आली. चित्रकला स्पर्धेत इ. ७ वी अ मधील पुढील विद्यार्थी बक्षिसपात्र ठरले.

१) उन्नती सकपाळ २) भैरवेश मोरे ३) क्रिपा पाटील तर वक्तृत्व स्पर्धेत इ. ९ अ मधील १) नंदिनी पवार २) मानसी मांडवकर. इ. ९ क मधील ३) मृणाली मोरे ह्या विद्यार्थिनी बक्षिसपात्र ठरल्या.



वरील विद्यार्थ्यांना बँक ऑफ महाराष्ट्रच्या शाखा व्यवस्थापक मा. अलका आठवले यांच्या हस्ते पारितोषिके देण्यात आली.

यशस्वी विद्यार्थ्यांचे हार्दिक अभिनंदन!

- Thane District Legal Services Authority तर्फे पुढील विषयावर चित्रकला स्पर्धेचे आयोजन केले होते. ही स्पर्धा ९ नोव्हेंबर २०२१ रोजी घेण्यात आली.

१) मुलांची कर्तव्ये २) सामाजिक चुका आणि वाईट प्रवृत्ती आणि कायदे ३) भारतीय महिलांचा दर्जा.

वरील स्पर्धेतील यशस्वी विद्यार्थी पुढीलप्रमाणे -

प्रथम क्रमांक - प्रयाग समीर खेडेकर - ८ वी अ

द्वितीय क्रमांक - सिमरन सुभाष नवले - ९ वी अ

तृतीय क्रमांक - श्रावणी राजेश पर्शराम - १० वी अ

उत्तेजनार्थ - अनवी अनंत फलके - ८ वी अ

यशस्वी विद्यार्थ्यांचे अभिनंदन.

## बालदिन

दि. १६ नोव्हेंबर २०२१ रोजी इ. ९ वीच्या प्रत्येक तुकडीत बालदिन साजरा करण्यात आला. सौ. दातार बाई आणि श्री. देसले सर यांनी पं. नेहरू आणि बालदिनाविषयी आपले विचार व्यक्त केले. पं. नेहरुंच्या कार्याचा परिचय करून दिला.

## वाचन प्रेरणा दिन

शुक्रवार दि. १५ ऑक्टोबर २०२१ रोजी इ. ५ वी अ, ब, क च्या विद्यार्थ्यांनी ऑनलाईन 'वाचन प्रेरणा दिन' साजरा केला. यात विद्यार्थ्यांनी वाचनाचे महत्त्व सांगून पुस्तक वाचन केले.

## संविधान दिन

शुक्रवार दि. २६ नोव्हेंबर २०२१ रोजी इ. ५ वीच्या विद्यार्थ्यांनी तसेच इ. ७ वी, इ. ८ वी व इ. ९ वीच्या विद्यार्थ्यांनी ऑनलाईन संविधान दिन साजरा केला. यात संविधानाविषयी माहिती सादर करून त्यात डॉ. बाबासाहेब आंबेडकर यांचे महत्त्वपूर्ण योगदान याची माहिती दिली.

## ऑनलाईन कार्यशाळा

5th Belt and Road Teenager Maker Camp And Teacher's Workshop या चीन मधील Workshop ला आपल्या शाळेतील पाच विद्यार्थी आणि दोन शिक्षक असा सात जणांचा गट उपस्थित होता.

कार्यशाळेचा विषय आणि सहभागी शिक्षक व विद्यार्थी पुढीलप्रमाणे आहेत.

१) Space Science – सौ. धोत्रे
विद्यार्थी – श्रेया रांगळे, विप्रा पेटकर

२) Low Carbon Conservation – सौ. नेत्रा सोनावणे
विद्यार्थी – स्वरा दाभाडे, हितिका रावळ, मृणाल काळे

## दि. १९/११/२०२१ स्काऊट-गाईड कार्यक्रम



राष्ट्रीय पर्यावरण जागरुकता कार्यक्रम दि. १३ ते १७ नोव्हेंबर या कालावधीत त्रिकुटा भवन कटरा, वैष्णोदेवी, जम्मू-काश्मीर येथे आयोजित केला होता.

सदर कार्यक्रमासाठी आपल्या शाळेतील शिक्षिका सौ. कल्पना बोरवणकर आणि इ. ९ तील कु. संजना बोरवणकर उपस्थित होत्या. या कार्यक्रमात नऊ राज्यांचा सहभाग होता. महाराष्ट्रातून आपल्या एकमेव शाळेने सहभाग घेतला. कार्यक्रमात पुढील स्पर्धा घेण्यात आल्यात.

कटरा-वैष्णोदेवी-भैरवनात असा १४ कि.मी. पायी ट्रेक, सांस्कृतिक कार्यक्रम, प्लास्टीक विरोधी घोषवाक्ये इ.

वरील पाच दिवसांचा कार्यक्रम पूर्ण केल्यानंतर प्रमाणपत्र व भेटवस्तू देऊन गौरवण्यात आले.

## क्रीडा ॲकॅडमी



सोमवार दि. १५ नोव्हेंबर २०२१ रोजी विद्या प्रसारक मंडळाच्या क्रीडा ॲकॅडमीचे उद्घाटन झाले. यावेळी आपल्या शाळेतर्फे श्री. तळेले सर, सौ. धनगर, सौ. धोत्रे, सौ. तातळे इ. शिक्षक उपस्थित होते. क्रीडा ॲकॅडमीत आपल्या शाळेतील ४५ विद्यार्थ्यांनी प्रवेश

घेतला. तसेच अ‍ॅकॅडमी तर्फे घेण्यात आलेल्या सेमिनार मध्ये शाळेतील विद्यार्थी व पालक मोठ्या संख्येने उपस्थित होते. पालकांनी परिसंवादात सक्रीय सहभाग घेतला.

### दि. २४ नोव्हेंबर २०२१ व्याख्यान




आचार्य अत्रे कट्टा, ठाणेतर्फे 'माई सावरकर यांचे जीवन' या विषयावर व्याख्यानाचे आयोजन करण्यात आले होते. या विषयावर आपल्या शाळेतील शिक्षिका साधना जोशी यांनी उपस्थितांशी संवाद साधला. साधना जोशी या माई सावरकर या पुस्तकाच्या लेखिका आहेत.

### पुस्तक प्रकाशन दि. ४/ १२/२१



आपल्या शाळेतील शिक्षिका साधना जोशी यांचे ४ थे पुस्तक 'ये मृत्यो ये' हे पुस्तक प्रकाशित झाले. नाशिक येथे संपन्न झालेल्या ९४ व्या अखिल भारतीय मराठी साहित्य संमेलनात मान्यवरांच्या हस्ते सदर पुस्तकाचे प्रकाशन झाले. व्यास क्रिएशन तर्फे प्रकाशित झालेल्या या पुस्तकास खूप खूप शुभेच्छा !

## सौ. आनंदीबाई जोशी इंग्रजी पूर्व प्राथमिक विभाग

### ऑक्टोबर महिन्यातील उपक्रम :-

### ७ ऑक्टोबर ते १४ ऑक्टोबर २०२१ - नवरात्र

७ ऑक्टोबर पासून सुरू होणाऱ्या नवरात्र उत्सवाची माहिती बुधवार ६ ऑक्टोबर रोजी ऑनलाईन सत्रात शिक्षकांनी दिली. देवीची विविध रूपे - सरस्वती, माँ दुर्गा, महिषासुरमर्दिनी दाखवली. या उत्सवा दरम्यान खेळले जाणारे भोंडला, गरबा, दांडिया या विषयी सुद्धा चित्रावरून माहिती दिली गेली.

या नऊ दिवसात मुलांनी वारानुसार विविध रंगांचे कपडे परिधान केले होते. या दरम्यान देवीचे श्लोक, मुलांना शिकवले गेले. तसेच आधीच्या संगीताच्या तासिकेत भोंडल्याची गाणी शिक्षकांनी गायली.

### १५ ऑक्टोबर २०२१ - दसरा

१५ ऑक्टोबर रोजी साजरा होणारा नवरात्रीतला शेवटचा दिवस म्हणजे दसरा.

१४ ऑक्टोबरला दसरा सणाची माहिती, पाटीपूजनाचे महत्त्व, आपट्याच्या पानांचे महत्त्व मुलांना सांगितले गेले.

१५ ऑक्टोबर हा दिवस भारताचे दिवंगत राष्ट्रपती डॉ. अब्दुल कलाम यांचा जन्मदिवस. या महान कर्तृत्ववान व्यक्तीची मुलांना ओळख करून देण्यात आली. हा दिवस वाचन प्रेरणा दिवस म्हणून साजरा केला जातो. मुलांना वाचनाचे फायदे व महत्त्व शिक्षकांनी सांगितले.

### १९ ऑक्टोबर - ईद आणि कोजागिरी पौर्णिमा.

१८ ऑक्टोबरच्या ऑनलाईन सत्रात मुस्लिम बांधवांच्या ईद या सणाची माहिती दिली गेली. तसेच कोजागिरी पौर्णिमेचे महत्त्व सांगितले गेले.

---

रिस्क घेणे ही सगळ्यात मोठी सुरुवात असते!

**११ ऑक्टोबर ते २२ ऑक्टोबर – प्रथम निरिक्षण (First Observation).**

या काळात मुलांचे प्रथम सत्रात विविध विषयांत शिकवलेल्या संकल्पनांवर (concepts) आधारित निरिक्षण ऑनलाईन, तसेच कार्यपत्रिका (worksheets) या द्वारे घेण्यात आले.

या बद्दलचे विषयवार वेळापत्रक पालकांना व्हॉट्सअप ग्रुपवर पाठवण्यात आले. काही संकल्पनांसाठी कार्यपत्रिका शाळेच्या वेबसाईटवर, तसेच व्हॉटसअप ग्रुपवर पाठवण्यात आल्या.

पालकांना या सोडवलेल्या कार्यपत्रिका (worksheets), चित्रकला वही व सिनियरच्या मुलांच्या इंग्रजी व गणित विषयांच्या वह्या शाळेत जमा करण्यास सांगण्यात आले.

**२५ ऑक्टोबर – दिवाळी**

दिवाळी सणाबद्दल माहिती त्यातील प्रत्येक दिवसाचे महत्त्व मुलांना चित्रांद्वारे सांगण्यात आले. दिवाळीसंबंधीचे एक गाणे (video) मुलांना दाखवले व मुलांनी त्याचा आनंद लुटला.

दिवाळी सणाचा उपक्रम म्हणून शिक्षकांनी, ज्यूनियर व सिनियरच्या मुलांनी मातीच्या पणत्या रंगवल्या, तसेच घरात उपलब्ध असलेल्या साहित्यातून त्या पणत्या सजवल्या. नर्सरीच्या मुलांनी पणतीचे चित्र रंगवले. (stencil uploaded).

शिक्षकांनी मुलांना व पालकांना दिवाळीच्या शुभेच्छा दिल्या. २६ ऑक्टोबर ते १९ नोव्हेंबर दिवाळीची सुट्टी जाहीर करण्यात आली अशा प्रकारे २०२१-२०२२ चे शैक्षणिक वर्षाच्या प्रथम सत्राची सांगता झाली.

## सौ. आनंदीबाई जोशी इंग्रजी प्राथमिक विभाग

**सौ. आनंदीबाई केशव जोशी शाळेत ऑनलाईन दिवाळी उत्सवाचे आयोजन २०२१**

या वर्षी सौ. ए. के. जोशी इंग्लीश मिडियम स्कूलच्या प्राथमिक विभागाच्या विद्यार्थ्यांनी (इयत्ता १ली ते ४थी) दिवाळी उत्सव अतिशय उत्साहाने साजरा केला.

या कार्यक्रमांत शिक्षकांनी विविध विषयांवर विद्यार्थ्यांना पावर पॉईंटच्या माध्यमातून माहिती दिली. महामारीच्या काळात दिवाळी साजरी करताना कोणती काळजी घ्यावी, फटाके फोडताना काय काळजी घ्यावी अशा विषयावर चर्चा करण्यात आली. तसेच, सोप्या पद्धतीने रांगोळी कशी काढावी व कंदील कसा तयार करावा या विषयांवर प्रात्यक्षिक देण्यात आले.

कार्यक्रमाच्या शेवटी, विद्यार्थ्यांनी बनवलेले कंदिलांचे सादरीकरण करण्यात आले. अशा प्रकारे दिपोत्सव अतिशय उत्साहाने करण्यात आला.

**ऑनलाईन स्पेल बी आंतरराष्ट्रीय परीक्षेचा निकाल**

आपणास कळविण्यास आनंद होत आहे की, स्पेल बी लेव्हल-१ च्या निकालात सौ. ए. के. जोशी शाळेच्या विद्यार्थ्यांनी घवघवीत यश संपादन केले आहे.

त्यांची नावे खालीलप्रमाणे :

- **उच्चक्रमांक पटकवलेला विद्यार्थी :**

| अनु.क्र. | विद्यार्थ्यांचे नाव | इ. | मिळालेले गुण |
|---|---|---|---|
| १. | विआन जयेश डोके | ४थी | १०० |

- **प्रशस्तिपत्रक पटकविलेले विद्यार्थी :**

| अनु.क्र. | विद्यार्थ्यांचे नाव | इ. | मिळालेले गुण |
|---|---|---|---|
| १. | जेनिता जितेंद्र लोणे | १ली | ९६ |

| | | | |
|---|---|---|---|
| २. | सान्वी भगत | २री | ९८ |
| ३. | सान्वी कार्तिक मुडबिडरी | २री | ९८ |

**• अचिव्हमेंट इन डिस्टींग्शन कॅटेगिरी पटकाविलेले विद्यार्थी :**

| अनु. क्र. | विद्यार्थ्यांचे नाव | इ. | मिळालेले गुण |
|---|---|---|---|
| १. | साईश संदीप शेट्ये | १ली | ९२ |
| २. | अन्वी हृषिकेश केळकर | १ली | ९० |
| ३. | वेदश्री पराग जोशी | १ली | ८४ |
| ४. | अन्वीश तुषार चव्हाण | १ली | ७८ |
| ५. | तनय नीतिन कारेकर | १ली | ७६ |
| ६. | अथर्व समीर रानडे | २री | ९६ |
| ७. | काव्या मिस्त्री | २री | ९४ |
| ८. | युक्ता धिरज झगडे | २री | ९४ |
| ९. | आर्यन हर्षल डिचोलकर | २री | ९४ |
| १०. | रेवा पिंपळे | २री | ८८ |
| ११. | क्रिशय दीपक गाला | २री | ८८ |
| १२. | ओजस प्रकाश घाग | २री | ८२ |
| १३. | अन्वय अमेय दांडेकर | २री | ८२ |
| १४. | देवेश सिद्धार्थ नागवेकर | ३री | ९६ |
| १५. | कार्तिकी जगदीश शिंदे | ४थी | ८४ |
| १६. | अनिका आशुतोष गोळे | ४थी | ८४ |

**• सर्टिफिकेट ऑफ अचिव्हमेंट कॅटेगिरी पटकाविलेले विद्यार्थी :**

| अनु.क्र. | विद्यार्थ्यांचे नाव | इ. | मिळालेले गुण |
|---|---|---|---|
| १. | समर संदेश प्रभू | २री | ७० |
| २. | मृण्मयी मंदार रानडे | ४थी | ६० |

सर्व विद्यार्थ्यांचे मनःपूर्वक अभिनंदन.

## सौ. आनंदीबाई जोशी माध्यमिक विभाग

### बेल्ट आणि रोड शिबिराचे आयोजन

सौ. आनंदीबाई केशव जोशी शाळेतर्फे पाचव्या बेल्ट आणि रोड शिबिराचे आयोजन सप्टेंबर ते नोव्हेंबर दरम्यान करण्यात आले. हे शिबिर तेरा ते एकोणीस वयोगटातील विद्यार्थ्यांसाठी होते. शाळेतर्फे इयत्ता नववी मधून दोन गट निवडले गेले. विद्यार्थ्यांनी ऑनलाईनद्वारे विषयाचे सादरीकरण ऐकले. 'कार्बनचे प्रमाण व ऊर्जेचे संवर्धन' या मुख्य विषयासाठी विद्यार्थ्यांनी प्रकल्पाचे सादरीकरण केले.

गट १) विषय : १) कचऱ्याचा पुनर्वापर
२) ठिबक सिंचन

सहभागी विद्यार्थ्यांची नावे -

१) चिन्मय गोखले
२) जय जोशी

गट २) विषय : १) कचऱ्याचा पुनर्वापर
२) टाकाऊ कागदांचा पुनर्वापर

सहभागी विद्यार्थ्यांची नावे -

१) गौतमी सहस्रबुद्धे
२) तनया शिंदे
३) मिहिका पटवर्धन

वरील विषयांशी संबंधित भित्तीपत्रके, पाईल्स, चित्रपीत इत्यादी द्वारे विस्तृत सादरीकरण केले.

दोन्ही गटांना त्याबद्दल पुरस्कार दिले गेले.

सहभागी विद्यार्थ्यांना सौ. मीना निपाडकर, सौ. गौरी मोहिले या शिक्षिकांचे मोलाचे मार्गदर्शन लाभले. ऑनलाईन पद्धतीने प्रथमच आयोजित केलेल्या या शिबिराचा आगळावेगळा अनुभव विद्यार्थ्यांना प्रेरणादायी ठरला.

दहा गोष्टींमध्ये सामान्य राहण्यापेक्षा एकाच गोष्टीमध्ये महान बना.

**विद्या प्रसारक मंडळ, टी एम् सी लॉ कॉलेज, ठाणेतर्फे निबंध स्पर्धेचे आयोजन**

विद्या प्रसारक मंडळ, टी एम् सी लॉ कॉलेज, ठाणेतर्फे दिनांक २-१०-२०२१ ते १४-११-२०२१ दरम्यान जिल्हास्तरीय ‘आजादी का अमृत महोत्सव’ पॅन इंडिया तर्फे निबंध लेखन स्पर्धेचे आयोजन केले. इयत्ता आठवी ते दहावी मधील विद्यार्थ्यांसाठी ही स्पर्धा ठेवण्यात आली होती.


या स्पर्धेचा निकाल खालीलप्रमाणे :-

| अनुक्रमांक | विद्यार्थ्यांची नावे | पुरस्कार |
|---|---|---|
| १ | आदित्य गोखले | प्रथम |
| २ | निहारिका मोरे | द्वितीय |
| ३ | जान्हवी केळकर | तृतीय |
| ४ | गौरांगी पाटील | उत्तेजनार्थ |

## जोशी-बेडेकर महाविद्यालय

**जिद्द, मेहनत आणि योग्य नियोजन यशाची गुरुकिल्ली अर्जुन पुरुस्कार विजेत्या ललिता बाबर यांचे प्रतिपादन व्ही. पी. एम.च्या क्रीडा प्रबोधिनीचे शानदार उद्घाटन**

सोमवार, दिनांक १५ नोव्हेंबर २०२१ रोजी सकाळी सात वाजता विद्या प्रसारक मंडळाच्या क्रीडा प्रबोधिनीचे अर्जुन पुरस्कार विजेत्या ऑलिम्पिक धावपटू आणि सध्या उरणच्या प्रांताधिकारी असलेल्या ललिता बाबर-भोसले यांच्या हस्ते उद्घाटन झाले. मंडळाच्या क्रीडांगणावर पार पडलेल्या या कार्यक्रमाच्या अध्यक्षस्थानी विद्या प्रसारक मंडळाचे अध्यक्ष डॉ. विजय बेडेकर होते. विद्या प्रसारक मंडळाचे सन्माननीय सदस्य डॉ. महेश बेडेकर यांच्या संकल्पनेतून साकारलेल्या या प्रबोधनीच्या उद्घाटनाप्रसंगी स्ट्रायडर्स (Striders) प्रबोधिनीचे दीपक लोंढे, विद्या प्रसारक मंडळाचे कार्यवाह जयंत कयाळ, उत्तम जोशी आदी मान्यवर मंचावर उपस्थित होते . विद्या प्रसारक मंडळाच्या सर्व संस्थांचे प्राचार्य, मुख्याध्यापक आणि कर्मचारी व उत्साही खेळाडू विद्यार्थ्यांनी मोठ्या संख्येने या कार्यक्रमात सहभाग नोंदविला.




विद्यार्थ्यांच्या शैक्षणिक प्रगती सोबत शारीरिक सुदृढता लागण्यासाठी खेळांचे योगदान अत्यंत महत्त्वाचे आहे. क्रीडा संस्कृती ठाण्यातील विद्यार्थ्यांमध्ये रुजवावी या हेतूने विद्या प्रसारक मंडळाचे पदाधिकारी डॉ. महेश बेडेकर यांच्या प्रयत्नातून ही क्रीडा प्रबोधिनी साकारली आहे.

आजच्या उद्घाटन समारंभाच्या प्रास्ताविकात डॉ. महेश बेडेकर म्हणाले की, विद्यार्थ्यांनी अभ्यास व खेळाकडे गांभीर्याने पाहण्याची गरज आहे. शारीरिक सुदृढता वाढण्या सोबतच खिलाडूवृत्ती वृद्धिंगत करण्यासाठी देखील क्रीडा प्रबोधिनी उपयोगी ठरेल.

कार्यक्रमात प्रमुख पाहुण्या म्हणून आलेल्या अर्जुन पुरस्कार विजेत्या ऑलिम्पिक धावपटू ललिता बाबर भोसले यांनी विद्यार्थ्यांना क्रीडा प्रबोधिनीचा अधिकाधिक लाभ घेऊन राज्य, देश तसेच आंतरराष्ट्रीय पातळीवर देशाचं नाव उज्ज्वल करण्याचा संदेश दिला. कोरोना महामारीच्या परिप्रेक्षात आपण सर्वजण शारीरिक आरोग्या

मोठा माणूस तोच, जो आपल्या सोबतच्या माणसाला छोटा समजत नाही!

बद्दल जागरूक होणे गरजेचे असल्याचे त्या म्हणाल्या. कार्यक्रमात उपस्थित असलेल्या पालकांना देखील त्यांनी विद्यार्थ्यांसोबत क्रीडांगणावर येऊन शारीरिक क्षमता वृद्धिंगत करण्याच्या संदर्भात मार्गदर्शन केले. ग्रामीण भागातून येऊन क्रीडा क्षेत्रात आज जे नाव कमावले आहे त्यामागे माझी जिद्द, मेहनत, शिस्त आणि योग्य नियोजनाचा महत्त्वाचा वाटा असल्याचे त्यांनी अधोरेखित केले.

विद्या प्रसारक मंडळाचे कार्याध्यक्ष डॉ. विजय बेडेकर यांनी याप्रसंगी मार्गदर्शन करताना असे मत व्यक्त केले की, विद्यार्थ्यांनी बाजारात सहज उपलब्ध असलेले जंक फूड टाळावे व क्रीडांगणावर जाऊन भरपूर खेळावे. सुदृढ शरीरातच निरोगी व ऊर्जस्वल मनाचा वास असतो असे ते म्हणाले. या प्रसंगी, स्ट्रायडर्स (Striders) या क्रीडा क्षेत्रातील संस्थेचे दीपक लोंढे यांनी देखील आरोग्य आणि खेळाचे महत्त्व सांगून क्रीडा प्रबोधिनीच्या कार्यात अधिकाधिक विद्यार्थ्यांनी सहभागी होण्याचे आवाहन केले.

सौ. सुमेधा बेडेकर यांनी गायलेल्या राष्ट्रगीताने कार्यक्रमाची सांगता झाली. सौ. साधना जोशी यांनी या कार्यक्रमाचे सूत्रसंचालन केले.

**विश्व निवेशक सप्ताह २०२१**




विश्व निवेशक सप्ताहाचे औचित्य साधून जोशी–बेडेकर महाविद्यालयातील ‘थोरले बाजीराव’ सभागृहात दिनांक २७ नोव्हेंबर २०२१ रोजी ‘इंट्रोडक्शन टू सिक्युरिटीज मार्केट’ या कार्यक्रमाचे आयोजन करण्यात आले होते. महाविद्यालयातील अकाउंटन्सी विभाग तसेच NSE आणि NSDI यांच्या सहयोगाने पार पडलेल्या या कार्यक्रमासाठी डॉ. नीतिन जोशी (संचालक BRIMS), विजय हेमकर (CM, NSE), कॅन्डलीना रोड्रिगस (AM,NSDL) आणि व्ही. एम. बांदोडकर महाविद्यालयाचे प्राचार्य डॉ. मोझेस हे प्रमुख अतिथी म्हणून उपस्थित होते.

कार्यक्रमाची सुरुवात पाहुण्यांच्या हस्ते दीपप्रज्वलन आणि राष्ट्रगीताने झाली. पुढे निवेदकांनी प्रमुख पाहुण्यांची ओळख करून देत, पुष्पगुच्छ देऊन त्यांचे स्वागत केले. यानंतर कॉलेजच्या सीए विभागाचे प्राध्यापक योगेश प्रसादे यांनी उपस्थित अतिथींची व कार्यक्रमाची थोडक्यात ओळख करून दिली.

मुख्य कार्यक्रमाला सुरुवात करत प्रमुख अतिथी डॉक्टर नीतिन जोशी (संचालक BRIMS), यांनी शेअर बाजार या विषयावर थोडक्यात मार्गदर्शन केले. त्यानंतर पुढील मार्गदर्शनाची धुरा उपस्थित सेबीच्या (SEBI) अधिकाऱ्यांना दिली. पुढे सर्व विद्यार्थ्यांना आर्थिक गुंतवणूक आणि शेअर बाजारातील तत्त्वज्ञान स्पष्ट करून सदर अधिकाऱ्याने गुंतवणुकीचे प्रकार करण्याची पद्धत, शेअर बाजारात गुंतवणूक करताना घ्यावयाची काळजी अशा अनेक विषयांवर मार्गदर्शन केले. त्यानंतर एन एस डी एल च्या अधिकारी कॅन्डलीना रोड्रिग्स यांनी शेअर बाजाराचे फायदे तोटे व त्यातून गुंतवणूकदारांना होणारा नफा किंवा तोटा याबाबत सविस्तर माहिती दिली. मार्गदर्शनानंतर प्रश्नोत्तरांची फेरी घेत विद्यार्थ्यांच्या शंकांवर चर्चा करण्यात आली. त्यामुळे या संपूर्ण कार्यक्रमादरम्यान महाविद्यालयातील विद्यार्थ्यांना मोलाचे मार्गदर्शन, तसेच आर्थिक व्यवस्थापन आणि शेअर बाजार या बाबत योग्य ती माहिती मिळाली.


सरतेशेवटी उपस्थित मान्यवरांचे संस्थेच्या सीए विभागाचे प्राध्यापक योगेश प्रसादे यांनी आभार मानले आणि त्याचबरोबर संस्थेच्या परंपरेनुसार पसायदानाने कार्यक्रमाची सांगता करण्यात आली.

## बांदोडकर विज्ञान महाविद्यालय

### स्वच्छता मोहीम (गृह परिसर) Home Premises

वि.प्र.मं.चे बा. ना. बांदोडकर स्वायत्त विज्ञान महाविद्यालयामध्ये राष्ट्रीय सेवा योजना विभागातर्फे (एन.एस.एस.) विभागातर्फे २ ऑक्टोबर २०२१ रोजी एन.एस.एस. स्वयंसेवकांना स्वच्छतेबाबत प्रोत्साहित करण्यासाठी ऑनलाइन स्वच्छता मोहिमेचे आयोजन करण्यात आले होते.

सर्व कोविड-१९ मार्गदर्शक तत्त्वांचे पालन करून स्वयंसेवकांनी त्यांचा परिसर/घराचा परिसर वैयक्तिकरित्या स्वच्छ केला. एन.एस.एस. स्वयंसेवकांनी स्वच्छ केलेल्या परिसराचे छायाचित्र काढले आणि ते चित्र त्यांना दिलेल्या गुगल फॉर्मवर अपलोड केले. उपक्रम करत असताना स्वयंसेवकांनी छायाचित्रे/व्हिडिओ काढले आहेत आणि सक्रिय सहभाग वाढवण्यासाठी त्याची छायाचित्रे सोशल मीडियावर शेअर केली आहेत.






या मोहिमेत एकूण १६ स्वयंसेवक सहभागी झाले होते त्यापैकी ७ मुली स्वयंसेवक आणि ९ मुले स्वयंसेवक होते. या मोहिमेचा कालावधी सकाळी १० ते रात्री १० असा होता.

### लोगो स्पर्धा जैवतंत्रज्ञान आणि सूक्ष्मजीवशास्त्र विभाग लोगो स्पर्धा

बा. ना. बांदोडकर विज्ञान महाविद्यालय (स्वायत्त), ठाणे जैवतंत्रज्ञान आणि सूक्ष्मजीवशास्त्र विभाग या विभागातर्फे विद्यार्थ्यांच्या लपलेल्या कलागुणांना उजाळा देण्यासाठी मायक्रोबायोम : द स्टोरी अनटोल्ड! या राष्ट्रीय परिषदेसाठी लोगो स्पर्धा आयोजित करण्यात आली होती.

विविध थीम दर्शविणारा लोगो किंवा डिजिटल फॉरमॅटमध्ये लोगो बनवण्याचे आवाहन विद्यार्थ्यांना करण्यात आले. प्रवेशिका जमा करण्याची अंतिम तारीख १३ ऑक्टोबर २०२१ होती.

मुंबई, नवी मुंबई, पुणे आणि ठाणे येथील विविध १४ महाविद्यालयांमधून एकूण ६२ प्रवेशिका प्राप्त झाल्या. एकूण सहभागींची संख्या ४० होती. याकरिता तज्ज्ञ समिती पॅनेलद्वारे सर्वोत्कृष्ट पाच प्रवेशिका निवडल्या गेल्या. त्यानंतर आयोजक समितीच्या दहा सदस्यांनी सर्वोत्तम निवडण्यासाठी मतदान केले.

कु. ईशा पिसाळ, द्वितीय वर्ष सूक्ष्मजीवशास्त्र विभाग, बांदोडकर विज्ञान महाविद्यालय यांनी डिझाइन केलेला लोगो स्पर्धेचा विजेता म्हणून घोषित करण्यात आला.



**निवडलेल्या लोगोची प्रतिमा**

### बेटी बचाओ, बेटी पढाओ रॅली

बेटी बचाओ, बेटी पढाओ (मुलगी वाचवा, मुलीला शिक्षित करा) ही भारत सरकारची एक मोहीम आहे; ज्याचा उद्देश भारतातील मुलींसाठी असलेल्या

कल्याणकारी सेवांची जागृती निर्माण करणे आणि त्यांची कार्यक्षमता सुधारणे हे आहे. 'बेटी बचाओ, बेटी पढाओ' (BBBP) ला देशभर प्रोत्साहन देण्यासाठी भारत सरकारने राष्ट्रीय कार्यकारी समिती स्थापन केली आहे. ही समिती सेव्ह गर्ल चाइल्ड आणि टू एज्युकेट गर्ल चाइल्डला प्रोत्साहन देण्यासाठी अनेक कार्यक्रम आयोजित करत आहे.

वि.प्र.मं.चे टी.एम.सी. लॉ कॉलेज, ठाणे आणि राष्ट्रीय सेवा योजना (एन.एस.एस.); राष्ट्रीय छात्र सेना (एन.सी.सी.) युनिट्स वि.प्र.मं.चे. बा. ना. बांदोडकर विज्ञान महाविद्यालय (स्वायत्त) ठाणे, यांनी बेटी बचाओ, बेटी पढाओ रॅलीचे आयोजन १३ ऑक्टोबर २०२१रोजी केले होते. मुलींच्या महत्त्वाबाबत लोकांमध्ये जागृती निर्माण करणे हा या कार्यक्रमाचा मुख्य उद्देश होता. कार्यक्रमासाठी शिक्षक व विद्यार्थ्यांमध्ये मोठा उत्साह होता. ही रॅली कॉलेज कॅम्पस ते ठाणे रेल्वे स्टेशन अशी होती. दुपारी साडेबारा वाजता सुरू करण्यात आली. टीएमसी विधी महाविद्यालयाचे प्राचार्य डॉ. (सौ.) श्रीविद्या जयकुमार, विधी महाविद्यालयाचे सहायक प्राध्यापक वाघ विनोद हरिभाऊ (रॅलीचे इनचार्ज), बांदोडकर महाविद्यालयाचे एन.एस.एस. कार्यक्रम अधिकारी डॉ. उज्ज्वला गोखे आणि डॉ. प्रल्हाद वाघ आणि या कार्यक्रमास बांदोडकर महाविद्यालयाचे एन.सी.सी. कॅप्टन डॉ. बिपीन धुमाळे उपस्थित होते. उपस्थित सर्व मान्यवरांचा त्यांच्या उपस्थितीबद्दल I/C प्राचार्य डॉ. (सौ.) श्रीविद्या जयकुमार यांच्या हस्ते सत्कार करण्यात आला.

टी.एम.सी. विधी महाविद्यालयाचे विद्यार्थी, एन.एस.एस. स्वयंसेवक आणि बांदोडकर महाविद्यालयाचे एन.सी.सी. कॅडेट्स उपस्थित होते. दुपारी साडे-बारा वाजता ही रॅली सुरू झाली. विद्यार्थ्यांच्या हातात महत्त्वाचे संदेश देणारे बॅनर होते. 'बेटी बचाओ, बेटी पढाओ' हा संदेश देण्यासाठी एन.एस.एस. स्वयंसेवकांनी ठाणे स्टेशनजवळ पथनाट्यही सादर केले होते.

अशा प्रकारे बेटी बचाओ बेटी पढाओची जनजागृती झाली. ठाणे पोलीस विभागाच्या मार्गदर्शनाखाली हा कार्यक्रम पार पडला. Covid-19 प्रोटोकॉलचे पालन करून. हा कार्यक्रम दुपारी साडे-चार वाजता संपला. सर्व मान्यवर, विद्यार्थी, स्वयंसेवक, कॅडेट आणि उपस्थित सर्वांचे आभार वाघ विनोद हरिभाऊ यांनी मानले.

या कार्यक्रमासाठी एकूण २२ एन.एस.एस. स्वयंसेवक उपस्थित होते. त्यापैकी ११ मुली आणि ११ मुले स्वयंसेवक होते.





दुबळे लोक बदला घेतात, बलवान माफ करतात, तर बुद्धिमान दुर्लक्ष करतात!

**सायबर सुरक्षा जागरुकता व्याख्यान २६ नोव्हेंबर २०२१**

वि.प्र.मं.चे. बा.ना. बांदोडकर स्वायत्त विज्ञान महाविद्यालयामध्ये, महाराष्ट्र राज्य सायबर गुन्हे शाखा आणि क्विक हील फाऊंडेशन यांच्या संयुक्त विद्यमाने सायबर सुरक्षा या विषयावर २६ नोव्हेंबर २०२१ रोजी माहितीपूर्ण चर्चा आयोजित करण्यात आली होती.

निमंत्रित मान्यवरांमध्ये क्विक हील फाऊंडेशनच्या अध्यक्षा श्रीमती अनुपमा काटकर; संजय शिंत्रे, एसपी, महाराष्ट्र गुन्हे शाखा; श्रीमती अडसुळे, पीएसआय; श्रीमती नीलम वाव्हळ, पीआय, सायबर सेल; आणि अजय शिर्के, क्विक हीलचे कार्यक्रम व्यवस्थापक यांना निमंत्रित करण्यात आले होते.

बांदोडकर महाविद्यालयाच्या प्राध्यापक सदस्या कु.ज्युडिथ टॉकर यांनी आयोजित केलेल्या कार्यक्रमाचे सूत्रसंचालन केले. या सत्राची सुरुवात मान्यवरांच्या हस्ते दीपप्रज्वलन करून, पाहुण्यांचा सत्कार आणि बांदोडकर महाविद्यालयाचे प्राचार्य डॉ. मोझेस कोलेट यांच्या स्वागतपर भाषणाने झाली.

श्री. अजय शिर्के यांनी श्रोत्यांना मंत्रमुग्ध करणाऱ्या आभासी जगाविषयी थोडक्यात माहिती दिली आणि सायबर शोषणाला कारणीभूत ठरणाऱ्या अशा प्रकरणांमध्ये एखादी व्यक्ती सहज कशी गुंतून जाते आणि अडकते याच्या बद्दल थोडक्यात माहिती दिली. श्रीमती. नीलम वाव्हळ यांनी देखील सायबर सुरक्षेच्या गरजेवर भर दिला आणि सहभागी विद्यार्थ्यांना सायबर-दक्ष राहण्याचे आवाहन केले. श्री. कयाळ सरांनीही आभासी जगाबाबतच्या परिस्थितीतील बदल आणि त्यातून निर्माण होणारे नवे प्रख्यात धोके याबद्दल त्यांचे मत व्यक्त केले. शेवटी संजय शिंत्रे यांनी आपल्या संक्षिप्त भाषणात महाराष्ट्र सायबर सेलचा उद्देश स्पष्ट केला. त्यांनी सुरक्षित नेटवर्किंगची गरज देखील स्पष्ट केली आणि सुरक्षिततेसाठी वापरता येण्याजोग्या काही खबरदारीच्या टिप्स देखील दिल्या. सायबर गुन्हे आणि सुरक्षेबाबतच्या त्यांच्या शंका आणि चिंतांचे निराकरण करण्यासाठी त्यांनी सहभागींशी संवाद साधला आणि चर्चा केली. कु. ज्युडिथ टॉकर यांच्या आभार प्रदर्शनाने सत्राची सांगता झाली. बांदोडकर महाविद्यालय, क्विक हील फाऊंडेशन, महाराष्ट्र सायबर आणि निमकर आर्टस् यांच्या संयुक्त विद्यमाने एक लघु पथनाट्यही आयोजित करण्यात आले होते, ज्याने सायबर गुन्ह्यांच्या विविध प्रकारांबाबत आणि त्यांच्या प्रतिबंधाबाबत जनजागृती केली.

एकूणच, या सत्राला उपस्थित मान्यवर, पाहुणे आणि श्रोत्यांकडून या सत्राची प्रशंसा झाली.

या सत्राला एकून ३२७ सभासदांनी आपला सहभाग नोंदवला.







जीवन कितीही कठीण असले तरी त्यामध्ये करण्यासारखे नेहमीच काहीतरी असते, ज्यात तुम्ही यशस्वी होऊ शकता.

## विशेष प्राविण्य

वि.प्र.मं.चे बा.ना. बांदोडकर स्वायत्त विज्ञान महाविद्यालयामध्ये एम.एस.सी. पर्यावरण शास्त्र मध्ये शिकणाऱ्या कु. मुस्कान अब्दुल हमीद खान विद्यार्थिनीने मुंबई विद्यापीठाचे एन्विरो केअर सुरेश आर. अमृतकर सुवर्णपदक जिंकले.





डॉ. विंदा मांजरमकर, सहयोगी प्राध्यापक, प्राणीशास्त्र विभाग यांनी संशोधन क्षेत्रात अतिशय महत्त्वपूर्ण योगदान दिले आहे. त्यांच्या ४ पेटंटला मान्यता प्राप्त झाली आहे.

**पेटंटचा तपशील :**

1. "Development of Mercury on Detection Sensor using Field Effect Transistor In Waste Water" या विषयावर आंतरराष्ट्रीय पेटंटला मान्यता प्राप्त झाली आहे.
2. A Method for Formulating Vegetables and Fruits Waste Culture Medium For Industrial Fungi Cultivation.
3. An Organic Food preservative Composition
4. A Method For Formulation of Natural Laboratory Disinfectant using Orange peel waste.

## विद्या प्रसारक मंडळाचे ठाणे नगरपालिका विधी महाविद्यालय

### शिकवणी वर्ग

द्वितिय विधीच्या सत्र तीनची शिकवणी वर्ग दिनांक ४ ऑक्टोबर २०२१ पासुन सुरू करण्यात आली. सदर वर्ग हे अभासी मंचावरुनच घेण्यात येत आहेत. द्वितिय सत्राच्या परीक्षेनंतर सदर वर्ग सुरू करण्यात आलेले आहेत. २९ सप्टेंबर २०२१ ला परीक्षा संपल्या असून निकाल जाहीर होण्या अगोदर वेळेचे नुकसान होऊ नये म्हणून वर्ग सुरू करण्यात आले.

### कॅस प्रमोशन

सहाय्यक प्राध्यापक व प्रभारी प्राचार्या डॉ. श्रीविद्या जयाकुमार ह्यांनी आपला सहाय्यक प्राध्यापक स्टेज ३ ते स्टेज ४ कॅस पदोन्नती अर्ज २०१८ रोजी सादर केला होता. महाविद्यालयाच्या प्रभारी प्राचार्या यांचा कॅस प्रमोशनसंबंधीची बैठक दिनांक ४ ऑक्टोबर रोजी घेण्यात आली. एपीआयच्या गुणांची पडताळणी केल्यानंतर त्यांची पदोन्नती करण्याची शिफारस करण्यात आली.

### २ ऑक्टोबरची रॅली

राष्ट्रीय विधी सेवा प्राधिकरण यांच्या 'आझादी का अमृत महोत्सव' या निमित्ताने राबविण्यात येत असलेल्या देश व्यापी विधी जागृती अभियानाची सुरुवात दिनांक २ ऑक्टोबर २०२१ रोजी सकाळी ८.०० वाजता रॅलीच्या माध्यमातून करण्यात आली. ठाणे जिल्हा न्यायालय ते तलावपाळी अशा मार्गावर सदर रॅली काढण्यात आली होती. माननीय मुख्य जिल्हा व सत्र न्यायाधीश श्री. पानसरे, जिल्हा विधी सेवा प्राधिकरणाचे सचिव एम आर देशपांडे, महाराष्ट्र आणि गोवा अधिवक्ता मंडळाचे अध्यक्ष ॲड. गजानन चव्हाण, प्रभारी प्राचार्या डॉ. श्रीविद्या जयकुमार, महाविद्यालयाच्या

विधी सहाय्य केंद्राचे प्रभारी प्रा. विनोद एच. वाघ आणि जवळपास विधी महाविद्यालयाचे ४० विद्यार्थी यावेळी हजर होते. यावेळी आमच्या विद्यार्थ्यांनी अनेक पथनाट्याच्या माध्यमातून ग्राहक संरक्षण कायदा, कौटुंबिक हिंसाचार कायदा, शिक्षणाचा अधिकार अशा विषयावर विधी जागृती केली.






### १३ ऑक्टोबरची रॅली

राष्ट्रीय विधी सेवा प्राधिकरण यांच्या 'आझादी का अमृत महोत्सव' या निमित्ताने राबविण्यात येत असलेल्या देश व्यापी विधी जागृती अभियानाची सुरुवात दिनांक १३ ऑक्टोबर २०२१ रोजी दुपारी २.३० वाजता विद्या प्रसारक मंडळाचे टिएमसी विधी महाविद्यालय ते ठाणे रेल्वे स्टेशन अशा मार्गावर विधी जन जागृतीसाठी रॅली काढली. रॅलीमध्ये विधी महाविद्यालायाच्या विद्यार्थ्यांबरोबर बांदोडकर महाविद्यालायाचे एनएसएस व एनसीसीचे विद्यार्थी  यावेळेस सहभागी झाले होते. प्रभारी प्राचार्या डॉ. श्रीविद्या जयकुमार यांनी हिरवा झेंडा दाखवून रॅलीची सुरुवात करून दिली. प्रा. विनोद एच. वाघ, एनसीसी कॅप्टन श्री. बिपीन धुमाळे व एनएसएसच्या प्रोग्राम ऑफिसर श्रीमती. डॉ. उज्ज्वला बोके आणि असिस्टंट प्रोग्राम ऑफिसर मि. वाघ देखील हजर होते. ठाणेनगर पोलिसांची रॅलीसाठी संमती घेतली होती. मार्गक्रमण करीत असताना विद्यार्थ्यांनी न्याय सबके लिए' आणि 'बेटी बचाव बेटी पढाऔ' या संबधीच्या घोषणा दिल्या. डॉ. आंबेडकर यांच्या पुतळ्याजवळ विद्यार्थ्यांनी अनेक विषयांवर पथनाट्य सादर केले. यावेळी ठाणेनगर पोलिसांचेही सहकार्य लाभले होते. या रॅलीची बातमी न्यूज २४ या प्रसिद्ध चॅनेलमध्ये प्रसारीत करण्यात आली होती. बी. एन. बांदोडकर विज्ञान महाविद्यालयाचे प्राचार्य डॉ. मोजेस कोलेट यांनी कार्यक्रमासाठी शुभेछा दिल्या.








### पुस्तक समीक्षा स्पर्धा

दिनांक १२ ऑक्टोबर २०२१ रोजी महाविद्यालयाने ग्रंथपाल श्रीमती शितल सोनावणे यांच्या शिफारसेनुसार विधी विद्यार्थ्यांसाठी पुस्तक समीक्षा स्पर्धा आयोजित करण्यात आली होती. यास्पर्धेमध्ये विद्यार्थ्यांनी त्यांच्या आवडीच्या पुस्तकावर त्यांचे मनोगत व्यक्त केले. सदर

खेळ असो वा आयुष्य; आपलं सामर्थ्य तेव्हाच दाखवा, जेव्हा समोरचा आपल्याला कमजोर समजत असेल.

कार्यक्रमात प्रभारी प्राचार्या डॉ. श्रीविद्या जयाकुमार यांनी विद्यार्थ्यांना वाचनाचे महत्त्व सांगत त्यांनी अधिकाधिक वाचन करावे म्हणून प्रोत्साहित केले. या स्पर्धेसाठी प्रा. विनोद एच वाघ आणि प्रा. हेतल मिशेरी यांनी परिक्षकाचे काम बघितले. या स्पर्धेचे विजेते खालील प्रमाणे होते.

- **पहिले पारितोषिक १००० रुपये आणि प्रमाणपत्र**
  क्षितिजा खांगटे आणि अपेक्षा पवार (विभागून)
- **दुसरे पारितोषिक ७०० रुपये आणि प्रमाणपत्र**
  नेहा बहेलिया आणि राजेश सावंत (विभागून)
- **तिसरे पारितोषिक रुपये ५०० आणि प्रमाणपत्र**
  मीनल अहिरे आणि भगवान पाटील (विभागून)



**ठाणे महानगर पालिकेत विधी जनजागृती**

दिनांक १३ ऑक्टोबर २०२१ रोजी महाविद्यालयाच्या माध्यमातून ठाणे महानगर पालिकेचे आवारामध्ये विधी जागृती कार्यक्रम राबविण्यात आला होता. महापालिकेचे विधी अधिकारी श्री. काळे, प्रा. विनोद एच. वाघ यावेळी उपस्थित होते. तृतीय विधीचे विद्यार्थी जगन्नाथ कुलकर्णी यांनी यावेळेस मुलांचे अधिकार या विषयावर माहिती दिली.

**सत्र पाचची प्रात्यक्षिकं**

तृतीय विधि सत्र ५ या सत्राची प्रात्यक्षिक परीक्षेचा भाग म्हणून अभिरूप न्यायालय घेण्यात आले. जवळपास दोन महिने चाललेले हे अभिरूप न्यायालय प्रात्यक्षिक २८ ऑक्टोबर २०२१ रोजी संपवण्यात आले. तसेच सर्व विषयांची व्हायवा दिनांक एक आणि दोन नोव्हेंबर रोजी घेण्यात आला.

**विविध व्याख्याने**

विद्या प्रसारक मंडळाच्या टीएमसी विधी महाविद्यालय यांनी विधी जागृती संबंधी अनेक व्याख्याने आयोजित केली. ११ ऑक्टोबर २०२१ रोजी 'बेटी बचाव बेटी पढाओ' या विषयावर चित्रकला स्पर्धा आयोजित करण्यात आली होती. सदर स्पर्धा ही सर्वांसाठी खुली होती. या स्पर्धेचा निकाल १५ ऑक्टोबर २०१९ रोजी लावण्यात आला. या स्पर्धेचे विजेते खालील प्रमाणे होते.

**प्रथम पारितोषिक रु. २०००/-**

आदिती विकास नारकर (तृतीय वर्ष) पदवी अभ्यासक्रम - माहिती तंत्रज्ञान (IF) व्हीपीएम पॉलिटेक्निक, ठाणे

**द्वितीय पारितोषिक रु. १५००/-**

साई अनिल सणस (पदवी अभ्यासक्रम आणि वर्ष: SYCO) व्हीपीएम पॉलिटेक्निक, ठाणे

**तृतीय पारितोषिक रु. १०००/- (विभागून)**

खुशी किशोर भंडारी (अभ्यासक्रम:- F.Y.B.Sc. IT) एन.बी. मेहता सायन्स कॉलेज (वलवाडा) आणि

एकता कैलास पाटील (२ रे वर्ष एलएलबी) न्यू लॉ कॉलेज, माटुंगा, मुंबई

**ऑफलाइन शिकवणी वर्ग**

मुंबई विद्यापीठाच्या सूचनेप्रमाणे दिनांक २० ऑक्टोबर २०२१ पासून दिलेल्या नियमांचे पालन करून ऑफलाइन शिकवणी वर्ग सुरू करण्यात आले यावेळेस प्रभारी प्राचार्य श्रीविद्या जयकुमार यांनी विद्यार्थ्यांचे पुष्पगुच्छ देऊन स्वागत केले. ऑफलाइन

आणि ऑनलाईन अशा दोन्ही प्रकारे शिकवणी वर्ग सुरू करण्यात आले.



### बालगुन्हेगार व संरक्षण यावर विशेष व्याख्यान

विद्या प्रसारक मंडळाचे टिएमसी विधी महाविद्यालय आणि जिल्हा विधी सेवा प्राधिकरण ठाणे यांच्या माध्यमातून बालगुन्हेगार आणि बाल सुधार गृह या विषयावर श्रीमती कवाळे दिवाणी न्यायाधीश कनिष्ठ स्तर भिवंडी यांचे व्याख्यान आभासी मंचावरून दिनांक २१ ऑक्टोबर २०२१ रोजी आयोजित करण्यात आले होते.

### राष्ट्रीय विधी सेवा प्राधिकरण यांच्या योजनेविषयीचे व्याख्यान

विधी महाविद्यालय आणि जिल्हा विधी सेवा प्राधिकरण ठाणे यांच्या माध्यमातून दिनांक २२ ऑक्टोबर २०२१ रोजी राष्ट्रीय विधी सेवा प्राधिकरण यांच्या लहान मुलांच्या संरक्षण संबंधीचे व्याख्यान आयोजित करण्यात आले होते. सदर व्याख्यान धनराज खरे, वरिष्ठ कार्यक्रम समन्वयक सालम बालक ट्रस्ट, ठाणे दिले. सदर व्याख्यान गुगल मिटच्या आभासी मंचावरून आयोजित करण्यात आले होते.

### IQAC आणि कॉलेज डेव्हलपमेंट कमिटीची बैठक

दिनांक ३० ऑक्टोबर २०२१ रोजी महाविद्यालयाच्या IQAC आणि कॉलेज डेव्हलपमेंट कमिटी यांची बैठक घेण्यात आली. या बैठकीसाठी सर्व सन्माननीय सदस्य हजर होते. डॉक्टर विजय बेडेकर, श्री. कयाल, ॲड. राम आपटे, ॲड. गजानन चव्हाण हे या वेळेस उपस्थित होते.

### अभिरूप न्यायालय स्पर्धा

विधी महाविद्यालय आणि जिल्हा विधी सेवा प्राधिकरण यांच्या माध्यमातून आजादी का अमृत महोत्सव या कार्यक्रमानिमित्त अभिरूप न्यायालय स्पर्धेचे आयोजन करण्यात आले होते. स्पर्धेचे परीक्षक म्हणून अधिवक्ता आय. ए. शेख हे होते. सदर स्पर्धा ही आभासी मंच गुगल मीट यावर घेण्यात आली. या स्पर्धेचे विजेते खालील प्रमाणे होते.

### याचिकाकर्त्यासाठी सर्वोत्तम मूटर

प्रथम पारितोषिक - श्री. कोठारी ऋषभ - SDSM कॉलेज ऑफ लॉ, पालघर

द्वितीय पारितोषिक - श्री. अधिया योगेश - SDSM कॉलेज ऑफ लॉ, पालघर

तृतीय पारितोषिक - कु. पेडणेकर रिद्धी - व्हीपीएमचे टीएमसी लॉ कॉलेज, ठाणे

### प्रतिसादकर्त्यासाठी सर्वोत्तम मूटर

कु. पाटील प्रियांका: एमजीएम कॉलेज ऑफ लॉ, नेरुळ

### उत्तेजनार्थ

कु. मिश्रा पुष्पम: जितेंद्र चव्हाण कॉलेज ऑफ लॉ

## विधी जागृती अभियान

दिनांक २ ऑक्टोबर २०२१ पासून विधी महाविद्यालयाच्या विद्यार्थ्यांनी ठाणे जिल्ह्यामध्ये अनेक ठिकाणी विधी जागृती अभियान राबवले. राष्ट्रीय विधी सेवा प्राधिकरण व जिल्हा विधी सेवा प्राधिकरण यांच्या सूचनेप्रमाणे महाविद्यालयाच्या विद्यार्थ्यांनी विविध ठिकाणी व्याख्यान, पथनाट्य या माध्यमांतून विधी जागृती करण्याचे काम केले. मागील एक महिन्यांमध्ये प्रत्येक दिवशी महाविद्यालयाच्या विद्यार्थ्यांनी ठाणे जिल्ह्याच्या काही भागांमध्ये माहितीपुस्तिका वाटणे, पथनाट्य सादर करणे, शाळा-महाविद्यालय व कोचिंग क्लास मध्ये व्याख्यान देणे, तसेच हाउसिंग सोसायटींमध्ये विधी जागृती करणे आणि ठाणे शहरात विविध ठिकाणी ट्रॅफिक पोलिसांना मदत करणे व वाहनचालकांना ट्राफिक रुल समजावून सांगण्याचे काम केले आहे. या सर्व विद्यार्थ्यांचे कौतुक महाविद्यालयाचे प्रभारी प्राचार्य डॉक्टर श्रीविद्या जयाकुमार आणि जिल्हा विधी सेवा प्राधिकरण यांचे सचिव व दिवाणी न्यायाधीश वरिष्ठ स्तर श्री. मंगेश देशपांडे यांनी केले आहे. तसेच महाविद्यालयातील शिक्षकेतर कर्मचारी यांनी देखील या कार्यक्रमामध्ये विविध भागांमध्ये माहिती पुस्तिका देऊन सहभाग नोंदवला.



## महाराष्ट्र आणि गोवा अधिवक्ता मंडळाचे नवनियुक्त अध्यक्ष ॲड. गजानन चव्हाण, यांचा सत्कार समारंभ

विद्या प्रसारक मंडळाच्या टी एम सी विधी महाविद्यालयाने, महाराष्ट्र आणि गोवा अधिवक्ता मंडळाचे नवनियुक्त अध्यक्ष ॲड. गजानन चव्हाण, उपाध्यक्ष संग्राम चव्हाण आणि विशेष सरकारी अधिवक्ता श्रीमती गीता शर्मा यांचा सत्कार समारंभ २५ ऑक्टोबर २०२१ आयोजित करण्यात आला होता. यावेळी विद्या प्रसारक मंडळाचे अध्यक्ष डॉ. विजय बेडेकर, सचिव श्री. जे एन कयाल, आणि महाविद्यालयाच्या प्रभारी प्राचार्या डॉ. श्रीविद्या जयकुमार उपस्थित होत्या. यावेळी विधिबंध या माजी विद्यार्थ्यांचे संघटनाचे अनेक सदस्य, विद्यार्थी आणि इतर विद्यार्थी उपस्थित होते. अधिवक्ता श्री. सुनील परांजपे, वरिष्ठ अधिवक्ता ॲड. राम आपटे आणि श्रीमती माधवी नाईक यांनी सत्कारपर भाषण केले. डॉ. विजय बेडेकर यांनी सर्व मान्यवरांचा सत्कार करून त्यांचे अभिनंदन केले. ॲड. गजानन चव्हाण आणि श्रीमती गीता शर्मा या आमच्या महाविद्यालयाचे विद्यार्थी असल्याचा अभिमान असल्याचे डॉ बेडेकर यांनी आवर्जून सांगितले. विधीच्या विद्यार्थ्यांनी कसा अभ्यास आणि मेहनत करायला हवी याचे मार्गदर्शन करण्यात आले. ॲड. गजानन चव्हाण यांनी महाराष्ट्र आणि गोवा अधिवक्ता मंडळाने टाळेबंदी मध्ये, पूर आणि वादळामध्ये नुकसान झालेल्या वकिलांना कशाप्रकारे मदत केली याची माहिती दिली व भविष्यात काय उपक्रम राबविणार आहे याचीही माहिती दिली. स्वागतपर भाषण डॉ. श्रीविद्या जयकुमार यांनी केले. पाहुण्यांची ओळख प्रा. विनोद वाघ यांनी तर आभार प्रदर्शन प्रा. हेतल मशेरी यांनी केले. कार्यक्रमाचे संचालन यतीन पंडित यांनी केले. सदर कार्यक्रम हा थोरले पेशवे सभागृहामध्ये घेण्यात आला.

एक वेळ स्वतःची झोप कमी केलेली चालेल, पण स्वप्नं कमी करू नका!







**१ नोव्हेंबर, २०२१**

सत्र-IIIच्या विद्यार्थ्यांना प्रात्यक्षिक प्रशिक्षण परीक्षेसाठी आणखी एक संधी देण्यात आली. तसेच सत्र-VI च्या माजी विद्यार्थ्यांची डीपीसी परीक्षा घेण्यात आली.

**स्पर्धा**

विद्या प्रसारक मंडळाचे टिएमसी विधी महाविद्यालय, ठाणे आणि ठाणे जिल्हा विधी सेवा प्राधिकरण यांनी संयुक्तपणे खालील स्पर्धांचे आयोजन केले होते.

**I. इयत्ता ८ वी ते १० वी च्या शालेय विद्यार्थ्यांसाठी चित्रकला स्पर्धा. विजेते पुढीलप्रमाणे आहेत :-**

**विषय**

१. मुलांची कर्तव्ये
२. सामाजिक दुष्कृत्ये
३. भारतातील महिलांची कायद्याची स्थिती

| **विजेते** | | **बक्षीस** |
|---|---|---|
| कु. प्रयाग समीर खेडकर<br>इयत्ता-८ वी; विभाग-ए<br>विषय-भारतातील महिलांचा दर्जा | - | प्रथम क्रमांक |
| कु. सिमरन सुभाष नवले<br>इयत्ता-९वी; विभाग-ए<br>विषय - मुलांची कर्तव्यं | - | दुसरा क्रमांक |
| कु. श्रावणी राजेश प्रशाराम<br>इयत्ता-९वी; विभाग-ए<br>विषय - भारतातील महिलांचा दर्जा | - | तिसरा क्रमांक |
| कु. सिद्धी रमेश चव्हाण | - | उत्तेजनार्थ |
| कु. ओम अर्जुन ननावरे | - | उत्तेजनार्थ |

**II. इयत्ता ८ वी ते १० वीच्या शालेय विद्यार्थ्यांसाठी निबंध स्पर्धा. विजेते पुढीलप्रमाणे आहेत:-**

**विषय**

१. मुलांची कर्तव्ये
२. सामाजिक दुष्कृत्ये आणि कायदा
३. भारतातील महिलांची स्थिती

| **विजेते** | **बक्षीस** |
|---|---|
| मास्टर आदित्य गऱ्हाळे | प्रथम पारितोषिक |
| कु. निहारिका मोरे | द्वितीय पारितोषिक |

कु. जान्हवी केळकर तिसरे पारितोषिक

कु. गौरांगी पाटील उत्तेजनार्थ

**III. कनिष्ठ महाविद्यालयीन विद्यार्थ्यांसाठी स्लोगन लेखन स्पर्धा. विजेते पुढीलप्रमाणे आहेत :-**

**मराठी/हिंदी (स्लोगन) विजेते**

**विषय**

१. संविधान अंतर्गत नागरिकांची कर्तव्ये

२. सामाजिक दुष्कृत्ये आणि कायदा

**विजेते** **बक्षीस**

कु. स्मृती सुहास कोळी – प्रथम पारितोषिक
के. जी. जोशी कला महाविद्यालय
आणि एन. जी. बेडेकर कॉलेज
ऑफ कॉमर्स, ठाणे.

कु. पूर्वा राजेंद्र पष्टे – द्वितीय पारितोषिक
बी.एन.बांदोडकर विज्ञान
महाविद्यालय, ठाणे.

कु. मृणाल सिद्धार्थ मुटाटकर – तृतीय पारितोषिक
बी.एन.बांदोडकर विज्ञान
महाविद्यालय, ठाणे.

**इंग्रजी (स्लोगन) विजेते**

**विषय**

१. संविधान अंतर्गत नागरिकांची कर्तव्ये

२. सामाजिक दुष्कृत्ये आणि कायदा

**विजेते** **बक्षीस**

कु. वेदिका राजू खोचरे – प्रथम पारितोषिक
बी. एन. बांदोडकर विज्ञान
महाविद्यालय, ठाणे

कु. निकिता विजय आढाळगे – द्वितीय पारितोषिक
बी. एन. बांदोडकर विज्ञान
महाविद्यालय, ठाणे

श्री. सुजल कुमठेकर – तृतीय पारितोषिक
बी.एन. बांदोडकर विज्ञान
महाविद्यालय, ठाणे

**IV. पॉलिटेक्निकच्या विद्यार्थ्यांसाठी शॉर्ट फिल्म मेकिंग स्पर्धा.**

**विषय**

१. संविधान अंतर्गत मूलभूत कर्तव्ये

२. कामगार कल्याण

३. ट्रान्सजेंडरची समानता

**विजेते**

श्री. ढवळे चार्वाक अशोक, दुसरे वर्ष; हजेरी क्र. २७
शाखा – इन्स्ट्रुमेंटेशन

**V. मुंबई विद्यापीठ आणि एसएनडीटी विद्यापीठाच्या अंडरग्रेजुएट लॉ विद्यार्थ्यांसाठी मूट कोर्ट स्पर्धा**

स्पर्धेची तारीख ९ नोव्हेंबर २०२१– विषय – बालविवाह

**याचिकाकर्त्यासाठी सर्वोत्तम मूटर**

प्रथम पारितोषिक – श्री. कोठारी ऋषभ – SDSM कॉलेज ऑफ लॉ, पालघर

द्वितीय पारितोषिक – श्री. अधिया योगेश – SDSM कॉलेज ऑफ लॉ, पालघर

तृतीय पारितोषिक – कु. पेडणेकर रिद्धी – व्हीपीएमचे टीएमसी लॉ कॉलेज, ठाणे

**प्रतिसादकर्त्यासाठी सर्वोत्तम मूटर**

कु. पाटील प्रियांका – एमजीएम कॉलेज ऑफ लॉ, नेरुळ

उत्तेजनार्थ – कु. मिश्रा पुष्पम, जितेंद्र चव्हाण कॉलेज ऑफ लॉ

**१० नोव्हेंबर, २०२१**

तिसऱ्या वर्षाच्या विधी विद्यार्थांसाठी प्रात्यक्षिक प्रशिक्षण परीक्षेसाठी दुसरी संधी देण्यात आली.

**१४ नोव्हेंबर, २०२१**

पॅन इंडिया कायदेशीर जागरुकता कार्यक्रमाच्या समारोप प्रसंगी रॅली काढण्यात आली. या रॅलीला ठाणे जिल्हा न्यायालयापासून सुरुवात करण्यात आली. माननीय ठाणे जिल्हा विधी सेवा प्राधिकरणाचे सचिव, श्री. एम. आर. देशपांडे आणि इतर न्यायाधीश उपस्थित होते. आमच्या महाविद्यालयाच्या विद्यार्थ्यांनी शिक्षणाचा अधिकार, वाहतूक नियम आणि घरगुती हिंसाचार यावर पथनाट्य सादर केले. कायदेशीर सहाय्य कक्षाचे प्रभारी श्री. विनोद एच. वाघ हे विद्यार्थ्यां समवेत सहभागी होते.



**१८ आणि १९ नोव्हेंबर, २०२१** रोजी सत्र–III ची अंतर्गत परीक्षा घेण्यात आली.

**एक दिवसीय आंतरराष्ट्रीय परिषद**

२३ ऑक्टोंबर २०२१ रोजी डॉ. श्रीविद्या जयकुमार यांनी प्राण्यांच्या कायद्यांचे बदलणारे निसर्गचित्र या एक दिवसीय आंतरराष्ट्रीय परिषदेत भाग घेतला आणि भारतातील प्राण्यांवरील क्रूरता रोखण्याचे अधिकार मॉडेल – कायद्यामधील क्रूरता आणि त्याच्या पलीकडे या शीर्षकाचा एक शोधनिबंध सादर केला. विधी विद्याशाखा, पारुल विद्यापीठ, वडोदरा यांनी आयोजित केली होती.

**विशेष व्याख्यान**

दिनांक २० नोव्हेंबर, २०२१ रोजी जिल्हा प्रोबेशनल अधिकारी श्रीमती. विवियन सिल्वर यांचे प्रोबेशन ऑफेन्डर कायद्यावर विशेष व्याख्यान आयोजित करण्यात आले. तृतीय विधीच्या विद्यार्थ्यांच्या अभ्यासक्रमाचा भाग आणि फौजदारी कायद्याचा महत्वाचा असा हा विषय आहे. अभासी मंचावरुन सदर व्याख्यान घेण्यात आले.

**संविधान दिनानिमित्त व्याख्यान आणि स्पर्धा**

दिनांक २६ नोव्हेंबर, २०२१ रोजी सायंकाळी ६.०० वाजता भारतीय संविधान दिनानिमित्त महाविद्यालयातर्फे अभासी मंचाच्या माध्यमातून 'कायदा संपुष्टात आणण्याची प्रक्रिया आणि त्याचे परिणाम' या विषयावर डॉ. महेश बर्वे यांचे व्याख्यान आयोजित करण्यात आले होते. यावेळी प्रभारी प्राचार्या डॉ. श्रीविद्या जयाकुमार यांनी संविधानाची प्रस्तावना वाचली. विद्यार्थ्यांसाठी संविधान या विषयावर प्रश्नमंजुषेची स्पर्धा घेण्यात आली. मिस. रिद्धी पेडणेकर यांना प्रथम तर द्वितीय बक्षीस मिस. प्रिती भोईर आणि श्री. यश पुथरन यांच्यात विभागुन दिले गेले. तसेच तृतीय बक्षीस मिस. वैशाली कांबळे आणि मिस. इंदू पांडे यांना विभागुन देण्यात आले. सुत्रसंचालन आणि आभार प्रा. विनोद एच. वाघ यांनी मानले. कार्यक्रमाचा शेवट राष्ट्रगीताने करण्यात आला.

---

पैज लावायची तर स्वतः सोबतच लावा; कारण जिंकलात तर, स्वत:चा आत्मविश्वास जिंकाल आणि हरलात तर, स्वत:चाच अहंकार हराल.

**विशेष व्याख्यान**

अर्थ ब्रिगेडच्या संचालिका, डॉ. सरिता सुब्रमण्यम यांचे विशेष व्याख्यान, 'मनुष्य भक्षक मोठ्या मांजरी अस्तित्वात आहेत का? समस्या आणि कायदेशीरपणा' या विषयावर प्राणी संरक्षण कायदा या अॅड ऑन सर्टिफिकेट प्रोग्रामच्या विद्यार्थ्यांसाठी आयोजित करण्यात आले होते.

## विद्या प्रसारक मंडळाचे तंत्रनिकेतन

**२७ वी राष्ट्रीय परिषद अहवाल**

**श्री. तुषार मोहिते पाटील, राष्ट्रीय परिषद आयोजन सचिव**

विविध क्षेत्रातील सेन्सर्सच्या आगमनामुळे ऑटोमेशनचे जबरदस्त परिणाम दिसून येत आहेत. विविध उद्योगांमधील सेन्सर्सचा वापर नित्य आणि व्यावसायिक अशा दोन्ही प्रकारच्या विविध अनुप्रयोगांसाठी केला जातो. सेन्सर्स एकापेक्षा अधिक उपकरणे आणि प्रणालींना जोडून मशीन अधिक सक्षम करतात. लोकल कॉम्प्युटेशनल पॉवर आणि इंटरनेट ऑफ थिंग्ज (IoT) च्या संयोजनाने सामान्य सेन्सर बुद्धिमान सेन्सर्समध्ये बदलले आहेत; जसे की मोजमाप केलेला डेटा स्थानिक पातळीवर सेन्सर मॉड्यूलमध्ये जटिल पद्धतीने मोजला जातो. व्ही. पी. एम पॉलिटेक्निक, ठाणे या संस्थेने सेन्सर्सच्या विविध क्षेत्रांचा शोध घेण्यासाठी १९ आणि २० नोव्हेंबर २०२१ रोजी ऑटोमेशनमधील सेन्सर्सवर २७ वी राष्ट्रीय परिषद आयोजित करण्याचा निर्णय घेतला.

१९ नोव्हेंबर रोजी संमेलनाची सुरुवात तुषार मोहिते पाटील (विभाग प्रमुख, संमेलनाचे आयोजन सचिव) यांच्या स्वागतपर भाषणाने झाली. त्यांनी सर्व मान्यवर, वक्ते, व्यावसायिक आणि विविध संस्थांचे विद्यार्थी यांचे स्वागत केले. या संमेलनाचे निमंत्रक, आमचे प्राचार्य डॉ. डी. के. नायक यांनी संमेलनाच्या आयोजनाबाबत माहिती दिली. संमेलनाचे उद्घाटन परिषदेचे प्रमुख वक्ते व्ही. आर. जाधव (उपसचिव, CDC, MSBTE) यांच्या हस्ते ऑनलाईन पद्धतीने करण्यात आले. त्यांनी भाषणात सेन्सर्सच्या मूलभूत गोष्टी आणि वापरावर भर दिला. विद्यार्थ्यांच्या विचारप्रक्रियेला नवीन क्षितिज देणारी परिषद आयोजित केल्याबद्दल त्यांनी व्हीपीएम पॉलिटेक्निकचे अभिनंदन केले. डॉ. उषा राघवन (माहिती तंत्रज्ञान विभागाच्या प्रमुख, IIC समन्वयक) यांनी इनोव्हेशन आणि स्टार्टअप्सवर चर्चा केली. संस्थेच्या इनोव्हेटिव्ह कौन्सिल अंतर्गत होणाऱ्या विविध नावीन्यपूर्ण उपक्रमांची माहिती त्यांनी आपल्या भाषणातून विद्यार्थ्यांना करून दिली.

पहिले सत्र अजय लडकत, मुख्य तंत्रज्ञान अधिकारी, पार्कोमेट सोल्युशन्स LLP) यांनी घेतले. त्यांनी पॉवर सिस्टीममधील विविध सेन्सर समजावून सांगितले. बायोकिटचे संचालक सतीश जाधव यांनी बायोमेडिकल क्षेत्रात स्मार्ट सेन्सर्सची गरज अधोरेखित केली आहे. कोविड १९ महामारीच्या काळात प्रभावीपणे वापरलेली व्हेंटिलेटर, ऑक्सिजन कॉन्सन्ट्रेटर यासारखी विविध उपकरणे त्यांनी स्पष्ट केली. प्लांट ऑटोमेशनमध्ये वापरल्या जाणाऱ्या विविध सेन्सर्सवर विनोद नांबियार, सहाय्य जनरल मॅनेजर, इंस्ट्रुमेंटेशन, फिनोलेक्स इंडस्ट्रीज लिमिटेड, रत्नागिरी प्लांट, यांनी चर्चा केली. ओ. एन. बरुरे, संचालक, BITC २१०४ यांचे 'इंडस्ट्रियल ॲप्लिकेशन्स ऑफ सेन्सर्स' या विषयावर व्याख्यान झाले.

२० नोव्हेंबर रोजी सत्राची सुरुवात कॉर्पोरेट स्ट्रॅटेजी आणि टेक्नॉलॉजी सल्लागार अभय फणसीकर यांच्या भाषणाने झाली. त्यांनी IoT ॲप्लिकेशनसाठी LoRAWAN तंत्रज्ञानाचे प्रबोधन केले आहे. डॉ. अश्विनी कोत्राशेट्टी, विभाग प्रमुख, डॉन बॉस्को इन्स्टिट्यूट ऑफ टेक्नॉलॉजी, मुंबई यांनी संरक्षणातील विविध सेन्सर्सवर माहिती दिली. श्रीनिवास कुलकर्णी, सेंटर मॅनेजर, सेज ऑटोमेशन,

ठाणे यांचे 'सेन्सर्स इन पॉवर प्लांट' या विषयावर भाषण झाले. ॲलिस्टर डिसिल्वा, संचालक, ॲब्सोल्युट मोशन प्रा. ली. यांनी इंडस्ट्रियल ऑटोमेशनमधील विविध सेन्सर्सवर मार्गदर्शन केले. इन्स्ट्रुमेनेशन विभागाच्या अंतिम वर्षाच्या विद्यार्थ्यांनी 'IoT आधारित पर्यावरण विश्लेषण' या प्रकल्पाचे उत्कृष्ट प्रात्यक्षिक दिले. प्रात्यक्षिकानंतर, सुनील दळवी, भारत उत्पादन प्रमुख, इमर्सन, यांनी प्रक्रिया ऑटोमेशनमधील विविध सेन्सर ॲप्लिकेशन्सवर प्रकाश टाकला.

परिषदेच्या निमित्ताने व्हीपीएम पॉलिटेक्निकने ई-पोस्टर स्पर्धेचे आयोजन केले होते. संपूर्ण महाराष्ट्रातील २२ स्पर्धकांनी स्पर्धेसाठी नावीन्यपूर्ण आणि अप्रतिम ई-पोस्टर सादर केले. ५ विद्यार्थ्यांना २ विभागात प्रमाणपत्रे देण्यात आली - हस्तनिर्मित आणि सॉफ्टवेअर आधारित पोस्टर्स.

ई-पोस्टर स्पर्धेचे विजेते पुढीलप्रमाणे

**ई-पोस्टर स्पर्धा (सॉफ्टवेअर आधारित)**

| | **नाव** | **कॉलेजचे नाव** |
|---|---|---|
| प्रथम पारितोषिक | तन्वी चिमण | व्हीपीएम पॉलिटेक्निक, ठाणे |
| द्वितीय पारितोषिक | चिन्मय सावंत | ठाकूर पॉलिटेक्निक, कांदिवली |

**ई-पोस्टर स्पर्धा (हस्तनिर्मित)**

| | **नाव** | **कॉलेजचे नाव** |
|---|---|---|
| प्रथम पारितोषिक | समर्थ विलास सुर्वे | व्हीपीएम पॉलिटेक्निक, ठाणे |
| द्वितीय पारितोषिक | प्रचीती मिराशी झगडू | सिंग चॅरिटेबल ट्रस्ट |
| उत्तेजनार्थ | तबिन कादरी | व्हीपीएम पॉलिटेक्निक, ठाणे |

संपूर्ण महाराष्ट्रातून २५० हून अधिक स्पर्धकांनी या परिषदेला हजेरी लावली. यूट्यूबच्या माध्यमातून लाइव्ह कॉन्फरन्समध्ये अनेकांनी हजेरी लावली. अनेक व्यावसायिक आणि विद्यार्थ्यांनी परिषदेबद्दल त्यांचे उत्कृष्ट विचार आणि प्रतिक्रिया दिल्या. समारोपानंतर संमेलनाचे आयोजक सचिव तुषार मोहिते पाटील यांनी आभार मानले.


या ऑनलाइन कॉन्फरन्सने सर्व सहभागींना मुख्य सादरीकरण, विचारांची देवाणघेवाण, प्रश्नोत्तर सत्राद्वारे शंकांचे निरसन करून समवयस्कांमध्ये संवाद साधण्यास सक्षम केले. सर्व सत्रे खरोखर माहितीपूर्ण, ज्ञानपूर्ण आणि विलक्षण होती. या परिषदेने विविध क्षेत्रात प्रगत सेन्सर्समध्ये उत्कृष्टता मिळविण्यासाठी निश्चितपणे एक नवीन क्षितिज दिले आहे.





**व्ही. आर. जाधव (उपसचिव, CDC, MSBTE) यांच्या हस्ते परिषदेचे उद्घाटन झाले.**





**डॉ. अश्विनी कोत्राशेट्टी, विभाग प्रमुख, डॉन बॉस्को इन्स्टिट्यूट ऑफ टेक्नॉलॉजी, मुंबई संरक्षणातील विविध सेन्सर्सची माहिती देताना.**





श्रीनिवास कुलकर्णी, केंद्र व्यवस्थापक, सेज ऑटोमेशन, ठाणे 'पॉवर प्लांटमधील सेन्सर्स' या विषयावर भाषण देताना.



ऑलिस्टर डिसिल्वा, संचालक, ॲब्सोल्युट मोशन प्रा.ली. सेन्सर्सचे प्रात्यक्षिक दाखविताना





२७ व्या राष्ट्रीय परिषदेत उपस्थित असलेले प्राध्यापक व विद्यार्थी


## डॉ. वा. ना. बेडेकर व्यवस्थापन अभ्यास संस्था, ठाणे

**नोव्हेंबर २०२१ मधील कार्यक्रम / वार्ता**

१ नोव्हेंबर : विद्यार्थी, प्राध्यापक आणि कर्मचारी सदस्यांनी दक्षता जनजागृती सप्ताहाच्या पूर्वसंध्येला 'स्वतंत्र भारत (७५) अमृत महोत्सव : एकात्मतेसह आत्मनिर्भरता' या संकल्पनेची शपथ घेतली. कार्यक्रमाचे समन्वय डॉ. स्मिता जपे यांनी केले.


८-११ नोव्हेंबर : डॉ. स्मिता जपे यांनी सी आय आय एक्झिम बँक-बिझनेस एक्सलन्स अवॉर्ड २०२१ साठी मूल्यांकन सदस्या म्हणून, ओरिसाच्या पीबीएम माईन्स नाल्को या संस्थेचे मूल्यांकन केले.





१० नोव्हेंबर : प्रा. सिद्धेश सोमण यांनी वित्त शाखेच्या विद्यार्थ्यांसाठी वैयक्तिक मुलाखत मार्गदर्शन सत्र आयोजित केले. हे सत्र विद्यार्थ्यांना मुलाखतीला प्रभावीपणे सामोरे जाण्यासाठी तयार करण्याच्या उद्देशाने आयोजित करण्यात आले होते.

जर तुम्हाला आयुष्यामध्ये खूप संघर्ष करावा लागत असेल, तर स्वत:ला खूप नशीबवान समजा; कारण देव संघर्ष करायची संधी फक्त त्यांनाच देतो, ज्यांच्यामध्ये क्षमता असते!




१३ सप्टेंबर : डॉ. मीनाक्षी मल्होत्रा यांनी विद्यार्थी समितीच्या साहाय्याने ब्रिम्स कनेक्ट या मासिक कार्यक्रमाचे आयोजन केले.

१६ नोव्हेंबर : डॉ. पल्लवी चंदवासकर यांनी भारताच्या पश्चिम क्षेत्रातील आय क्यू ए सी संस्थांसाठी NAAC तर्फे राष्ट्रीय शैक्षणिक धोरणा संबंधित आयोजित ''सेन्सिटाईझींग हायर एजुकेशन इंस्टिट्युट्स (HEIs) अबाउट एन पी २०२०'' या वेबिनारला उपस्थित राहिल्या.





१९ नोव्हेंबर : ब्रिम्सच्या आय आय सी समिती आणि ई-सेल तर्फे ''करिअरच्या संधी म्हणून उद्योजकता आणि नावीन्य'' या विषयावर वक्ते महेश छत्रे यांच्या ऑनलाईन अतिथी सत्राचे आयोजन करण्यात आले.





२० नोव्हेंबर : ५ फेब्रुवारी २०२२ रोजी आयोजित होणाऱ्या ''व्यवस्थापन शिक्षण : अवलंबन, विश्लेषण, मूल्यांकन आणि निर्माणाद्वारे सुसंगतता / सुसंबंधितता'' (Management Education : Being Relevant through Applying, Analyzing, Evaluating and Creating) या परिषदेच्या विषयावर आधारित पूर्वार्ध कार्यशाळेचे (Pre-Cursory Workshop 2021) आयोजन करण्यात आले.

सत्राचे अतिथी वक्ते आणि अध्यापन व संशोधन क्षेत्रातील अनुभवी तज्ज्ञ, तसेच गाझियाबादच्या जयपूरिया स्कूल ऑफ बिझनेसचे संचालक डॉ. जितेंद्र कुमार मिश्रा यांनी केस स्टडी पद्धत, टप्प्याटप्प्याने केसेस हाताळणे आणि सर्वात महत्त्वाचे म्हणजे वर्ग सुरू करण्याआधी आणि नंतर विद्यार्थीवर्गाच्या सहभागाद्वारे अध्यापना विषयी मौल्यवान सादरीकरण केले आणि प्रेक्षकांच्या सर्व शंकांचे निरसन केले. डॉ. मिश्रा यांनी त्यांची स्वतःची लिखित केस स्टडी संदर्भासाठी व अभ्यासासाठी देऊन, प्राध्यापक सदस्यांशी चर्चा करत, सत्र संवादात्मक केले, सहभागींनी देखील सत्रातून मिळालेल्या शिकवणीचे कौतुक केले. देशभरातून सुमारे ५० प्राध्यापक कार्यशाळेला उपस्थित होते. संकल्पना समजून घेण्यासाठी केसेसचा उपयोग कसा करून घेता येईल आणि केस स्टडी कशी सोडवायची याबद्दल त्यांनी विद्यार्थ्यांना देखील संबोधित केले. शिकण्याच्या प्रक्रियेतील दृष्टीकोन म्हणून संबंधित केस स्टडीज कशा अनुकूल आणि विश्वासार्ह असू शकतात यावर त्यांनी भर दिला.




अनेक अपयशांची कारणीभूत बाब म्हणजे माणसाचा स्वभाव. ते जेव्हा प्रयत्न सोडतात, तेव्हा आपण यशाच्या किती जवळ आहोत याची त्यांना कल्पना नसते!




२० नोव्हेंबर : कार्यशाळेच्या उत्तरार्धात ''कॉर्पोरेट चाणक्य'' स्पर्धेचे आयोजन करण्यात आले. ज्यामध्ये देशभतील १५ विद्यार्थी संघांनी यात भाग घेतला आणि ''ऑसी ओट्स इंडिया''च्या द्वारे नेमून दिलेल्या वास्तव (लाइव्ह) केस स्टडीवर सादरीकरण केले. स्पर्धेचे परीक्षण श्रीमती. कोमल कनाबर (ऑसी ओट्स इंडियाच्या राष्ट्रीय प्रमुख), डॉ. पंकज नांदुरकर (सहयोगी प्राध्यापक, डीआर व्हीएन ब्रिम्स) आणि डॉ. पल्लवी चंदवासकर (सहाय्यक प्राध्यापक, डीआर व्हीएन ब्रिम्स) यांनी केले. भोपाळ स्कूल ऑफ सोशल सायन्सचे विद्यार्थी या स्पर्धेचे विजेते ठरले.




२२ ते २४ नोव्हेंबर : डॉ. नीतिन जोशी यांनी वेळणेश्वरला भेट दिली.




२२ नोव्हेंबर : डॉ. स्मिता जपे, AICTE द्वारे आयोजित इंटर्नशिपच्या संधींबाबत बैठकीला उपस्थित राहिल्या.



२६ नोव्हेंबर : डॉ. पल्लवी चंदवासकर यांनी यु जी सी (UGC) च्या निर्देशांनुसार, एम एम एस च्या विद्यार्थ्यांसाठी डॉ. व्ही. एन. ब्रिम्सतर्फे स्वातंत्र्याच्या ७५ व्या वर्षाच्या उत्सवाचा एक भाग म्हणून, संविधानाच्या प्रस्तावनेचे ऑनलाइन वाचन आयोजित केले आणि या दिवसाचे महत्त्व विद्यार्थ्यांना समजावून सांगितले.



२७ नोव्हेंबर : डॉ. नीतिन जोशी यांना आर. ए. ए. मीडिया प्रायव्हेट लिमिटेडतर्फे गुंतवणुकीबाबत जागरूकता

निर्माण करण्याच्या कार्यक्रमासाठी अतिथी वक्ते म्हणून आमंत्रित करण्यात आले.





२२ ते २६ नोव्हेंबर : डॉ. कंचन एआयसीटीई द्वारे आयोजित सार्वत्रिक मानवी मूल्ये या विषयावर आधारित ५ दिवसीय कार्यशाळेत सहभागी झाल्या.

३० नोव्हेंबर : वि. प्र. मं.च्या ॲडव्हान्स सेंटरच्या संचालक डॉ. माधुरी पेजावर यांनी डॉ. व्ही. एन. ब्रिम्सचे शैक्षणिक लेखापरीक्षण केले. डॉ. स्मिता जपे यांनी सर्व विभाग प्रमुख आणि शैक्षणिक लेखापरीक्षण प्रक्रियेचे समन्वयन केले.

अभ्यासक्रम पैलू : डॉ. पल्लवी चंदवासकर आणि प्रा. संदीप मोघे

शिकवणे, शिकणे आणि मूल्यमापन : डॉ. मीनाक्षी मल्होत्रा आणि प्रा. विभूती सावे

संशोधन आणि सल्लासेवा : डॉ. स्मिता जपे, डॉ. मीनाक्षी मल्होत्रा आणि प्रा. दीप्ती पेरीवाल


विस्तारित उपक्रम आणि शिक्षण संसाधने : प्रा. कृणाल पुंजानी, प्रा. सिद्धेश सोमण आणि डॉ. पंकज नंदूरकर


विद्यार्थी उपक्रम : प्रा. महेश भानुशाली आणि डॉ. कंचन अक्षय

ई-संसाधने : प्रा. संदीप मोघे

शैक्षणिक सुविधा : श्री. वैभव पंडित

ग्रंथालय विभाग - श्री. संजय सपकाळ




३० नोव्हेंबर : डॉ. मीनाक्षी मल्होत्रा यांनी इम्पिरिकल इकॉनॉमिक्स लेटर्स या (ABDC सूचीबद्ध) नियतकालीकासाठी "अ स्टडी ऑफ रिटेल लोकेशन स्ट्रॅटेजि विथ स्पेशल रेफरन्स टू कस्टमर एक्सपीरिअन्स मॅनेजमेंट इन गोवा" या शोधनिबंधाचे समीक्षण यशस्वीरित्या पूर्ण केले.

## महर्षी परशुराम अभियांत्रिकी महाविद्यालय, वेळणेश्वर

**अहवाल कालावधी : ०१ जुलै २०२१ ते ३० नोव्हेंबर २०२१**

दिनांक १४ ऑगस्ट २०२१ रोजी महाविद्यालयातील ट्रेनिंग अँड प्लेसमेंट विभागातर्फे 'स्किलिंग इंजिनिअर्स फॉर प्रोफेशनल सक्सेस' या विषयावर एक दिवसीय वेबिनार संपन्न झाला. सदर वेबिनार कोकण रेल्वे अकादमीच्या सहकार्याने पार पडला. या वेबिनारसाठी प्रमुख वक्ते म्हणून कोकण रेल्वे अकादमी मडगाव, गोवा येथील श्री. सूर्यशेखर (वरिष्ठ प्रशिक्षक) हे लाभले. त्यांनी कोकण रेल्वेमधील नावीन्य आणि आव्हाने आणि कोकण रेल्वेमध्ये उपलब्ध असलेल्या करिअरच्या संधी याविषयी सविस्तर माहिती दिली. तसेच त्यांनी यावेळी तेथील उपलब्ध प्रशिक्षण कार्यक्रमांचीही माहिती उपस्थितांना दिली. या सत्रासाठी जवळपास ६५ विद्यार्थी आणि ५ प्राध्यापक उपस्थित होते.

दिनांक ७ सप्टेंबर २०२१ रोजी महाविद्यालयाच्या पब्लिसिटी समिती मार्फत कोकणातील बारावी विज्ञान शाखेतील विद्यार्थ्यांना MHT-CET २०२१ ह्या ऑनलाईन परीक्षेसाठी मार्गदर्शन म्हणून 'MOCK TEST' चे आयोजन करण्यात आले. यावेळी एकूण ९४ विद्यार्थ्यांनी ही परीक्षा दिली. ह्यासाठी Google Forms चा वापर करून प्रश्नपत्रिका तयार करण्यात आली. प्रथम वर्ष विभागाच्या गणित, भौतिकशास्त्र आणि रसायनशास्त्र विभागाच्या शिक्षकांनी ही प्रश्नपत्रिका तयार केली होती.

दिनांक १५ सप्टेंबर २०२१ रोजी महाविद्यालयातील विद्युत अभियांत्रिकी विभागातर्फे 'अभियंता दिनाचे' औचित्य साधून 'शाश्वत विकासासाठी ऊर्जा स्रोत' या विषयावर वेबिनार संपन्न झाला. या वेबिनारसाठी प्रमुख व्याख्याते म्हणून डॉ. नीतिन लिंगायत (इन्स्टिटच्यूट ऑफ पेट्रोकेमिकल टेक्नोलॉजी, लोणेरे) यांची उपस्थिती लाभली. डॉ. लिंगायत यांनी प्रगत तंत्रज्ञान निर्माण करण्याच्या अनेक संधी विशद केल्या. पारंपरिक ऊर्जा स्रोत, त्याचे फायदे आणि भविष्यातील ऊर्जेचे शाश्वत पर्याय या विषयावर त्यांनी भाष्य केले. सदर वेबिनार हा विभागातील द्वितीय, तृतीय व अंतिम वर्षातील शिकत असणाऱ्या विद्यार्थ्यांसाठी आयोजित करण्यात आला होता. गुगल मीट या ऑनलाईन प्लॅटफॉर्मद्वारे या वेबिनारचे आयोजन करण्यात आले होते.

दिनांक १७ व १८ सप्टेंबर २०२१ रोजी महाविद्यालयातील स्थापत्य अभियांत्रिकी विभागाने तीन सत्रांमध्ये विविध विषयावर तज्ज्ञ व्याख्यात्यांचे आयोजन केले होते. यामध्ये पूल बांधकाम (Bridge Construction), सागरी बांधकाम प्रगती (Marine Construction Advancement) आणि मेट्रो रेल्वे प्रकल्प या विषयांचा समावेश होता. विभागातील तृतीय वर्ष व अंतिम वर्षात शिकत असणाऱ्या विद्यार्थ्यांसाठी हे सत्र आयोजित करण्यात आले होते. या क्षेत्रात काम करत असताना विद्यार्थ्यांना येणाऱ्या संधी आणि आव्हानांची जाणीव करून देणे हा यामागील मुख्य उद्देश होता. वरिष्ठ वैज्ञानिक परिषदेचे सदस्य प्रफुल्ल पागनिस यांनी विद्यार्थ्यांना पुल, मेट्रो आणि संपूर्ण भारतातील सागरी बांधकामाच्या होत असलेल्या असंख्य मोठ्या प्रकल्पासंबंधी उपस्थितांना मार्गदर्शन केले. सदर वेबिनार ऑनलाईन गुगल मीट प्लॅटफॉर्मवर पॉवर पॉइंट प्रेझेंटेशनद्वारे सादरीकरण करण्यात आले. विद्यार्थ्यांना या क्षेत्रांमध्ये उपलब्ध असलेल्या विविध नोकरीच्या संधी आणि पूल आणि मेट्रो प्रकल्पांच्या बांधकामासाठी अवलंबलेल्या टप्प्याटप्प्याने कार्यपद्धतीची माहिती मिळाली.

दिनांक ०१ ऑक्टोबर २०२१ रोजी महाविद्यालयातील अभियांत्रिकी विभागातर्फे एकदिवसीय ऑनलाईन वेबिनारचे आयोजन करण्यात आले. सदर वेबिनार 'रोल

ऑफ इंजिनिअर्स इन मॉर्डन इंडस्ट्रील ऑटोमेशन' या विषयावर पार पडला. सदर वेबिनार 'गुगल मीट' या आज्ञावली द्वारे पार पडले. औद्योगिक ऑटोमेशन मध्ये होत असलेली क्रांती व या क्षेत्रातील मेक्ट्रॉनिक्स मध्ये झालेली सध्याची सुधारणा तसेच सध्याच्या आधुनिक औद्योगिक स्वयंचलित उपकरणांमध्ये प्रोग्रॅमिंग आणि कमिन्सिंग कसे केले जातात यावर सविस्तर विवेचन करण्यात आले. त्याचप्रमाणे औद्योगिक ऑटोमेशन क्षेत्रामध्ये करिअरची सुरुवात कशी करावी व त्या क्षेत्रात नोकरी करण्यासाठी कोणकोणती कौशल्ये आत्मसात करणे आवश्यक आहेत यावर उपस्थित विद्यार्थ्यांना मार्गदर्शन करण्यात आले. सदर कार्यशाळेसाठी तज्ज्ञ व्याख्याते म्हणून डायरेक्टर, प्रॉसपेक्टिव्ह ऑटोमेशन व सिस्टीम एलएलपी, ठाणे येथील सुशांत रोडगे व चिन्मय तिगडे हे लाभले. या वेबिनारमध्ये इन्स्ट्रुमेंटेशन विभागातील द्वितीय, तृतीय व अंतिम वर्षातील विद्यार्थ्यांनी सहभाग नोंदविला. कार्यशाळेचे समन्वयक म्हणून इन्स्ट्रुमेंटेशन अभियांत्रिकी विभागाचे प्रा. केशव ज. चौगुले यांनी काम पाहिले.

दिनांक ०१ ऑक्टोबर व १४ ऑक्टोबर २०२१ रोजी महाविद्यालयातील प्रथम वर्ष अभियांत्रिकी विभागाद्वारे ऑनलाईन वेबिनार आयोजित करण्यात आले. सदर वेबिनारमध्ये 'Fifteen Practical Ways to Improve Your English' या विषयावर महाविद्यालयातील प्रा. गणेश दिवे यांनी उपस्थितांना संबोधित केले. जिल्ह्यातील महाराष्ट्र पॉलीटेक्निक, मंडणगड; तसेच शासकीय पॉलीटेक्निक, रत्नागिरी येथील विद्यार्थ्यांनी या वेबिनारमध्ये सहभाग नोंदविला. यावेळी गुगल मीट आज्ञावलीद्वारे हे ऑनलाईन वेबिनार घेण्यात आले.

इंग्रजी भाषा ही जागतिक संवादाची भाषा बनली आहे. त्यामुळे इंग्रजी भाषेकडे आंतरराष्ट्रीय स्तरावर व्यवहारासाठी जास्त वापरली जाणारी भाषा म्हणून ओळखली जाते. माहिती तंत्रज्ञान, वैद्यकीय शास्त्र, खगोलशास्त्र यासारख्या अनेक क्षेत्रातील माहितीचा ज्ञानाचा खजिना इंग्रजी भाषेत मुबलक प्रमाणात उपलब्ध आहे. त्याकरिता दैनंदिन जीवनात इंग्रजी भाषेचे ज्ञान असणे अत्यंत आवश्यक बनले आहे. मात्र ही भाषा शिकताना व्याकरणाला अवास्तव महत्त्व देऊ नये असे त्यांनी सांगितले. इंग्रजी भाषेकडे छंद म्हणून बघून ती दैनंदिन जीवनात शिकण्याशी जोडली पाहिजे. आजच्या स्पर्धेच्या युगात चौकटी बाहेरील शिक्षण घेणे गरजेचे आहे. ही भाषा शिकताना तिच्याकडे एक माध्यम म्हणून बघावे, अंतिम ध्येय म्हणून बघू नये असे त्यांनी सांगितले. आज आपण कोरोनाच्या काळात सुद्धा घरबसल्या स्मार्ट फोनद्वारे इंग्रजी भाषेशी मैत्री करू शकतो. त्यासाठी त्यांनी विविध मोफत असणाऱ्या १५ ॲप्स संदर्भात माहिती दिली. यामध्ये Duolingo, BBC learning English, Hello English, Learn English Daily यासारखे विविध ॲप्स मोबाईल मध्ये घेऊन ऑनलाईन संवाद साधू शकतो.

यावेळी महाराष्ट्र पॉलीटेक्निक, मंडणगड महाविद्यालयातील स्थापत्य अभियांत्रिकी व मेकॅनिकल अभियांत्रिकी विभागातील ५० विद्यार्थी तसेच शासकीय पॉलीटेक्निक, रत्नागिरी मधील मेकॅनिकल अभियांत्रिकी विभागाच्या एकूण ९४ विद्यार्थ्यांनी या ऑनलाईन वेबिनार मध्ये सहभाग दर्शविला. या वेबिनारचे समन्वयक म्हणून वेळणेश्वर अभियांत्रिकी महाविद्यालाचे प्रथम वर्ष अभियांत्रिकी विभागाचे विभागप्रमुख डॉ. अमितकुमार माने यांनी काम पाहिले.

दिनांक ०२ ऑक्टोबर २०२१ रोजी महाविद्यालयातील प्रथम वर्ष अभियांत्रिकी विभागाने राष्ट्रपिता महात्मा गांधी जयंती आणि आंतरराष्ट्रीय अहिंसा दिनाचे औचित्य साधून ऑनलाईन कार्यक्रम घेतला. यामध्ये प्रश्नमंजुषा आणि हिंसा न करण्याची प्रतिज्ञा घेण्याचा कार्यक्रम

घेतला गेला. सदर कार्यक्रमामध्ये एकूण २६७ लोकांनीं सहभाग नोंदवला. यावेळी प्रत्येक सहभागी सदस्याला महाविद्यालयातर्फे ई-प्रमाणपत्र देण्यात आले. या कार्यक्रमाचे समन्वयक म्हणून प्रथम वर्ष अभियांत्रिकी विभागातील प्रा. औदुंबर पाटकर यांनी काम पाहिले.

दिनांक १८ ऑक्टोबर २०२१ रोजी महाविद्यालयातील महिला विकास कक्ष (Woman Development Committee अंतर्गत 'महिला आणि त्यांचे कायदेशीर हक्क' या विषयावर मार्गदर्शनपर कार्यक्रम पार पडला. या कार्यक्रमासाठी डॉ. प्रसाद ढेबे (Ph.D Agriculture, Assistant Police Inspector) यांची उपस्थिती लाभली. यावेळी त्यांनी महिलांसाठी सामाजिक आणि व्यावसायिक जीवनात मदत करू शकणाऱ्या कलम ३५४ व ३७६ सारखे सर्व कायदेशीर अधिकार स्पष्ट केले. त्यांनी सर्व महिला विद्यार्थ्यांना सोशल मीडिया प्लॅटफॉर्मच्या सुरक्षित वापराविषयी समजावून सांगितले. कारण ही पिढी मोठ्या प्रमाणावर त्यावर अवलंबून आहे. तसेच त्यांनी 'विशाखा समिती' सारख्या व्यासपीठाची माहिती दिली, ज्याचा वापर मुली आणि संस्थेतील महिला प्राध्यापक करू शकतात. तसेच त्यांनी सर्व महिला विद्यार्थिनींना कोणत्याही आपत्कालीन परिस्थितीत संस्थेच्या प्रमुखांशी संपर्क साधावा अशी सूचनाही केली. कोणताही गुन्हा घडल्यास त्यांनी खंबीरपणे उभे राहून कायदेशीर कारवाई केली पाहिजे हे ही विद्यार्थ्यांच्या लक्षात आणून दिले. प्रश्न-उत्तराचे सत्र देखील अतिशय संवादात्मक आणि सर्वांसाठी माहितीपूर्ण होते. यावेळी महाविद्यालयातील प्रा.वैभवी मेथा यांच्या आभार प्रदर्शनाने कार्यक्रमाची सांगता झाली. कार्यक्रमाचे सूत्रसंचालन प्रा. मिनल कोकरे यांनी केले.

दिनांक २३ ऑक्टोबर २०२१ रोजी महाविद्यालयातील प्रथम वर्ष अभियांत्रिकी विभागातर्फे 'राष्ट्रीय संशोधन ई-परिषद' पार पडली. या परिषदेचा विषय 'Advanced Materials and Applications (AMA-2021)' हा होता. कोरोनाच्या पार्श्वभूमीवर यंदा ही परिषद व्हर्चुअल पद्धतीत पार पडली. या ई-परिषदेचा मुख्य उद्देश हा विद्यार्थी, शिक्षक, संशोधक व उद्योजक यांच्यामध्ये ॲडवान्स मटेरीअल या क्षेत्रामध्ये घडणाऱ्या नवनवीन संशोधनाची व त्याच्या वापराची माहिती करून देणे हा होता.

यावेळी पुण्यश्लोक अहिल्यादेवी होळकर विद्यापीठ, सोलापूर येथील प्रा. विकास पाटील यांनी उपस्थितांना संबोधित करताना सांगितले की, संशोधन हे प्रत्येक ज्ञान शाखेत महत्त्वाचे असून गुणवत्तापूर्ण संशोधन ही काळाची गरज आहे. समाजातील सर्व प्रकारच्या आर्थिक बाबींवर तंत्रज्ञानाचा विशेष प्रभाव पडत असतो. सामाजिक सुधारणा, विकास व इतर सर्व बाबतींत झालेली प्रगती ही तंत्रज्ञानामुळेच शक्य झाली आहे.आपल्या देशातल्या मूलभूत संशोधनाची तंत्रज्ञानाबरोबर सांगड घालणे अत्यंत गरजेचे आहे. याचसोबत त्यांनी तयार केलेल्या विविध पेटंटस व वापरत असलेल्या संशोधन सामग्रीची उपस्थितांना माहिती दिली. भविष्यात विद्यार्थ्यांना या क्षेत्रात संशोधनातील वेगवेगळ्या संधीच्या वाटा कशाप्रकारे उपलब्ध होतील यावर त्यांनी सविस्तर विवेचन केले. या परिषदेला डॉ. बाबासाहेब आंबेडकर तंत्रशास्त्र विद्यापीठाचे प्रा. एस. बी. देवसरकर मुख्य अतिथी म्हणून लाभले. याचसोबत या परिषदेमध्ये तज्ज्ञ म्हणून प्रा. एल. एन. सिंग, डॉ. बाबासाहेब आंबेडकर तंत्रशास्त्र विद्यापीठ, लोणेरे यांनी सुद्धा उपस्थितांना मार्गदर्शन केले.

या राष्ट्रीय ई-परिषदेसाठी शंभरहून अधिक विज्ञान व तंत्रज्ञान क्षेत्रातील पदवी व पदव्युत्तर विद्यार्थी, शिक्षक, संशोधक व उद्योजकांनी सहभाग नोंदवला. यामध्ये सहभागी विविध सदस्यांकडून १७ शोध निबंध सादर करण्यात आले. यावेळी प्रत्येक सहभागी सदस्याला महाविद्यालयातर्फे ई-प्रमाणपत्र देण्यात आले. तसेच या

संशोधकांनी केलेल्या संशोधन कार्याचे प्रकाशन आंतरराष्ट्रीय नियतकालिकेमध्ये करण्यात येणार आहे. या ई-परिषदेचे समन्वयक म्हणून महाविद्यालयातील प्रथम वर्ष अभियांत्रिकी विभागाचे विभागप्रमुख डॉ. अमितकुमार माने यांनी काम पाहिले.

दिनांक ११ नोव्हेंबर २०२१ रोजी महाविद्यालयातील इन्स्टिट्यूशनल इनोव्हेशन कौन्सिल (IIC) यांच्या तर्फे राष्ट्रीय शिक्षण दिनाचे औचित्य साधून शिक्षणा संबंधी 'पॅनेल चर्चा - परिसंवाद' कार्यक्रम आयोजित करण्यात आला. स्वतंत्र भारताचे पहिले शिक्षण मंत्री मौलाना अबुल कलाम आझाद यांच्या जयंती स्मरणार्थ हा राष्ट्रीय शिक्षण दिन साजरा केला गेला. पॅनल चर्चा-परिसंवाद या कार्यक्रमात महाविद्यालयातील शिक्षक व शिक्षकेतर कर्मचारी यांनी सहभाग नोंदविला. यामध्ये प्रा. योगेश काटदरे, प्रा. नंदकिशोर चौगुले, डॉ. अमितकुमार माने, प्रा. स्वानंद जोशी, प्रभारी प्राचार्य अविनाश पवार, ग्रंथालय परिचर दिनेश खेडेकर, प्रा. मंदार पावरी, प्रा. श्रुती मुंडे, प्रा. केशव चौगुले यांनी या परिसंवादात सहभाग घेतला. या परिसंवादात उपस्थित सर्व वक्त्यांनी शिक्षणा संबंधित विविध पैलू उलगडले. या कार्यक्रमाचे आभार प्रदर्शन इन्स्टिट्युशनल इनोव्हेशन कौन्सिल समितीचे समन्वयक प्रा. गणेश दिवे यांनी केले.

दिनांक १६ नोव्हेंबर २०२१ रोजी महाविद्यालयातील इन्स्टिट्यूशनल इनोव्हेशन कौन्सिल या समिती अंतर्गत 'माझी कथा : यशस्वी स्टार्टअप संस्थापकाचे प्रेरक सत्र' या शीर्षकाखाली ऑनलाईन मार्गदर्शन कार्यक्रम घेण्यात आले. या शिबिरासाठी आय. आय. पी. मुंबई या कंपनीचे संस्थापक प्रतिक कळंबटे व सौ. माधुरी कळंबटे यांना आमंत्रित करण्यात आले होते. त्यांनी यावेळी स्टार्टअप म्हणून स्वतःचा प्रवास शेअर केला. त्यांनी माईंड मॅपिंग म्हणजे काय आणि कसे, केव्हा आणि कुठे स्टार्टअप सुरू करायचा आणि ध्येय कसे गाठायचे हे उपस्थितांशी स्पष्ट केले. यावेळी उपस्थित विद्यार्थी आणि प्राध्यापकांनी विचारलेल्या प्रश्नांचे त्यांनी समर्पक उत्तरे देऊन शंकांचे निरसन केले. या कार्यक्रमासाठी एकूण ५३ विद्यार्थी व कर्मचारी यांनी या कार्यक्रमाला उपस्थित लाभली. सर्व उपस्थितांना ई-प्रमाणपत्र देण्यात आले.

दिनांक २० नोव्हेंबर २०२१ रोजी महाविद्यालयातील इन्स्टिट्यूशनल इनोव्हेशन कौन्सिल या समिती अंतर्गत 'उद्योजकता आणि करिअरच्या संधी म्हणून नवोपक्रम' या विषयावर ऑनलाईन मार्गदर्शन कार्यक्रम घेण्यात आले. या मार्गदर्शन शिबिरासाठी स्वप्नील आगरकर (EDU360 Knowledge Solution Private Ltd, Mumbai) यांना या कार्यक्रमासाठी प्रमुख व्यक्ते म्हणून आमंत्रित केलेले होते. एक उद्योजक म्हणून स्वतःचा प्रवास शेअर केला आणि उद्योजकाची प्रमुख वैशिष्ट्ये सांगितली. सोशल मीडियाच्या अतिवापराबद्दल आणि एक नवोन्मेषक म्हणून व्यक्तिमत्त्व विकासासाठी सोशल मीडियावरील माहितीचा कसा उपयोग करायचा याबद्दलही त्यांनी आपली मते मांडली.

•••

## दिशासाठी

**आपले लेखनसहकार्य अपेक्षित आहे. आपल्या अध्ययन-अध्यापन विषयांतील नवीन घडामोडी, नवीन ज्ञानक्षेत्रे यांबाबत सातत्याने लेखन करणे हे अध्यापनात साहाय्यकारी ठरणारे आहे.**

**तरी, आपणांकडून लेखन अपेक्षित करीत आहोत.**

**- संपादक**

मेहनतीच्या काळात कुणावर अवलंबून राहू नका, म्हणजे परीक्षेच्या काळात कुणाचीही गरज भासणार नाही!

(पृष्ठ क्र.२ वरून - **संपादकीय)**

श्री शारदा शिक्षण मंडळाने या वसाहतीत एक शाळा चालविली आहे. शाळेच्या पदाधिकाऱ्यांनी गणित यात्रेच्या स्वागताची जंगी तयारी केली होती. यात्रेचा रथ मुख्य द्वारावर येताच त्यांनी नारळ फोडून रथाचे स्वागत केले. तिथून शाळेपर्यंत रथ वाजत-गाजत नेण्यात आला. यात्रेत सहभागी झालेल्या सगळ्या पाहुण्यांचे शाळेच्या प्रवेशद्वारावर पारंपरिक पद्धतीने औक्षण करून स्वागत करण्यात आले. दिवाळीच्या सुट्टीनंतर शाळा नुकत्याच सुरू झालेल्या होत्या. तरीही विद्यार्थ्यांची उपस्थिती चांगली होती. सुमारे ८०० विद्यार्थी उपस्थित होते. त्यांना बसायला सोयीचे व्हावे यासाठी शाळेच्या मध्यभागी एक प्रशस्त मंडप घातलेला होता. या मंडपात शाळेच्या गणवेशात सर्व विद्यार्थी शिस्तीत बसले होते. आम्ही पोहोचताच कार्यक्रमाला सुरुवात झाली. सुरुवातीला सर्व पाहुण्यांचा परिचय करून देणात आला, त्यानंतर गणित यात्रेचे नेमके प्रयोजन काय याची माहिती देण्यात आली. तसेच रामानुजन या महान गणिततज्ज्ञाची माहिती देण्यात आली. ते झाल्यावर मेहूल कुमार यांनी गणिताचे तर ब्रजेश दीक्षित यांनी विज्ञानाचे प्रयोग करून दाखवले. विद्यार्थी अगदी सकाळपासून बसले होते. कार्यक्रम संपायला दुपार झाली. तरीही विद्यार्थी प्रयोग सत्राचा आनंद घेत होते.

शुक्रवार दिनांक १२ नोव्हेंबर रोजी दुपारी गणित यात्रा किन्ही गावच्या सर्वोदय विद्यालयात गेली. ग्रामस्थांनी मोठ्या संख्येने उपस्थित राहून यात्रेचे स्वागत केले. गावातून दिंडी फिरविण्यात आली. शेवटीं बँड आणि लेझिमच्या तालात यात्रेचे शाळेच्या प्रांगणात आगमन झाले. स्वागत सोहळ्यापासून ते कृतीसत्रापर्यंत सर्व कार्यक्रमांचे आटोपशीर असे नियोजन करण्यात आले होते. या गावातील एक व्यक्ती राष्ट्रीय प्रयोगशाळेत वैज्ञानिक म्हणून काम करतात. गणित यात्रेच्या निमित्ताने त्यांना देखील पाचारण करून त्यांचा सत्कार करण्यात आला. करोनाच्या प्रादूर्भावामुळे शाळा अनेक महिने बंद होती. दिवाळीच्या आधी काही दिवस शाळा सुरू करण्यास शासनाने परवानगी दिली. त्यानंतर लगेच दिवाळीची सुट्टी लागली. सुट्टी नंतर शाळा नियमितपणे सुरू झाल्या नव्हत्या. तरीही शाळा चालकांनी विद्यार्थी आणि शिक्षक या यात्रेला मोठ्या संख्येने उपस्थित राहतोल याची काळजी घेतली होती. विद्यार्थ्यांनी देखील यात्रेत रस घेतला. न कंटाळता सांगितलेल्या सर्व कृती त्यांनी केल्या. त्यामुळे सूर्यास्ताला प्रसन्न मनाने आम्ही किन्ही गावाच्या बाहेर पडलो.

यात्रेचा दुसऱ्या दिवसाचा कार्यक्रम फारच व्यस्त होता. सकाळी बोदवड या गावी जायचे होते. त्याआधी शिंदी नावाच्या गावी सत्कार समारंभ आयोजित करण्यात आला. आम्ही जेव्हा गावाच्या वेशीवर पोहोचलो तेव्हा ग्रामपंचायत सदस्य आणि गावकरी आमच्या स्वागताला उपस्थित होते. ग्रामीण भागातील मुलांमध्ये गणिताची आवड निर्माण करण्याचे काम या यात्रेतून केले जात आहे याचे त्यांना फारच अप्रूप वाटत होते. आजपर्यंत त्यांनी धार्मिक कारणांसाठी निघालेली यात्रा पाहिली होती. शालेय अभ्यासक्रमात असलेल्या एका विषयाचा प्रचार आणि प्रसार करण्यासाठी काढलेली ही यात्रा ते पहिल्यांदाच पाहात होते. किन्ही गावाच्या ग्रामस्थांचा सत्कार स्वीकारून आम्ही ठरलेल्या वेळी बोदवडला पोहोचलो. येथे रांका विद्यालयात यात्रेचे आणि यात्रेत सहभागी असलेल्या सभासदांचे जंगी स्वागत करण्यात आले. शाळेचा परिसर उत्तम ठेवलेला आहे. विद्यार्थी मोठ्या संख्येने उपस्थित होते. तेथील शिक्षकांनी आणि विद्यार्थ्यांनी यात्रेचा पुरेपूर फायदा करून घेतला.

---

हरलात तरी चालेल; फक्त जिंकणाऱ्याने स्वतःहून म्हटलं पाहिजे;-
'हा खेळ आयुष्यातील सर्वात कठीण खेळ होता.'

बोदवड ते वरणगाव असा प्रवास करून आम्ही महात्मा गांधी विद्यालयात पोहोचलो. तिथे ग्रामस्थांबरोबरच काही राजकीय पक्षांच्या सभासदांनी यात्रेचे स्वागत केले. यात्रेचे महाराष्ट्र राज्याचे समन्वयक सुनील वानखेडे हे याच शाळेत कामाला आहेत. त्यांनी स्वतः लक्ष घालून कार्यक्रमाचे नियोजन केले होते. समारंभ आटोपशीर आणि प्रभावी झाला. शाळेतील विद्यार्थ्यांनी आलेल्या पाहुण्यांना अनेक प्रश्न विचारून आपले कुतूहल शमवून घेतले. यातून अशा यात्रेची किती निकड आहे हे स्पष्ट होते. अशा यात्रा नियमितपणे काढण्यात याव्यात असे आग्रही प्रतिपादन अनेक शिक्षकांनी केले. यात्रेचे सामाजिक स्वरूप लक्षात घेऊन तिच्या आयोजनात भुसावळ ताप्ती व्हॅली रोटरी क्लबने सुरुवातीपासूनच रस घेतला होता. शनिवारी सायंकाळी त्यांनी सर्व तज्ज्ञ व्यक्तींना त्यांच्या बैठकीला पाचारण करून त्या सर्वांचा सत्कार केला.

रविवार दिनांक १४ नोव्हेंबर हा गणित यात्रेचा महाराष्ट्रातील शेवटचा दिवस. त्या दिवशी कुर्हे नावाच्या गावाला भेट आयोजित केली होती. या गावातील शेतकरी विड्याच्या पानांचे मोठ्या प्रमाणावर उत्पादन करतात. म्हणून या गावाला कुर्हे पानांचे गाव असे संबोधतात. गाव तसे फार मोठे नाही. पण शाळा मात्र बरीच मोठी आहे. शाळेला विस्तीर्ण असे पटांगण आहे. शाळा एक वसतिगृह देखील चालविते. आजूबाजूला असलेल्या खेड्यांतील मुले मुली या शाळेचा उपयोग करून घेतात. रविवारचा दिवस होता, राज्य परिवहन महामंडळाचा संप चालू होता. तरीही विद्यार्थ्यांची उपस्थिती चांगली होती. वक्त्यांची भाषणे, गणित आणि विज्ञान कृतिसत्रे, प्रश्नोत्तरे असे सगळे कार्यक्रम सुरळीत पार पडले.

रामानुजन अमृत भारत गणित यात्रेत सहभागी होणे हा माझ्यासाठी आगळावेगळा अनुभव होता. ८२ दिवसांच्या या यात्रेचे नियोजन उत्तम प्रकारे करण्यात आले आहे. ज्या २५ राज्यांतून ही यात्रा जाणार आहे तेथील कार्यक्रमांचे आधीच नियोजन करण्यात आले आहे. तसेच यात्रेकरूंची एका राज्यातून दुसऱ्या राज्यात जाण्यासाठी व्यवस्था करण्यात आली आहे. विशेष हे की, ही सगळी कामे स्वयंसेवी संघटनेची मदत घेऊन करण्यात येत आहेत. यात सामील होणारे तज्ज्ञ आपापल्या खर्चाने येतात. तसेच आलेल्या पाहुण्यांची राहण्याची आणि जेवणाची व्यवस्था देखील स्थानिक स्वयंसेवी संघटना करतात. अशा प्रकारची ही पहिलीच यात्रा असावी असे मला वाटते. या यात्रेला उदंड यश लाभो अशी ईश्वर चरणी प्रार्थना करतो.

**– डॉ. सुधाकर आगरकर**

•••

**दिशा नियमित वाचा.**

आपली मते जाणून घेण्यास आम्ही उत्सुक आहोत.

**Posting under the Reg. No. MH/MR/TNC-27/2004-2006**

# विद्या प्रसारक मंडळ, ठाणे

- ❈ अत्याधुनिक दृक् श्राव्य यंत्रणा
- ❈ वातानुकूलित प्रसन्न वातावरण
- ❈ वाहने उभी करण्यासाठी प्रशस्त जागा

अशा सुविधांनी युक्त

| सभागृहाचे नाव | ठिकाण | आसन क्षमता |
|---|---|---|
| थोरले बाजीराव पेशवे सभागृह | महाविद्यालय परिसर | ३०० |
| कात्यायन सभागृह | कला/वाणिज्य इमारत | १६० |
| पातंजली सभागृह | बा. ना. बांदोडकर विज्ञान महाविद्यालय इमारत | १६० |
| पाणिनी सभागृह | डॉ. वा. ना. बेडेकर व्यवस्थापन अभ्यास संस्था इमारत | १८० |
| मनु सभागृह | वि. प्र. मं. चे ठाणे नगरपालिका विधी महाविद्यालय इमारत | २५० |

**❈ संपर्क ❈**

कार्यवाह

**विद्या प्रसारक मंडळ**

विष्णूनगर, नौपाडा, ठाणे - ४०० ६०२

दूरध्वनी क्रमांक - २५४२६२७०

हे मासिक प्रकाशक आणि संपादक डॉ. विजय वासुदेव बेडेकर व मुद्रक श्री. विलास सांगुर्डेकर, परफेक्ट प्रिण्टस्, नुरीबाबा दर्गा रोड, ठाणे - ४०० ६०१ या मुद्रणालयामध्ये छापून विद्या प्रसारक मंडळ, जिल्हा ठाणे-४०० ६०२ यांच्याकरिता विद्या प्रसारक मंडळ, डॉ. बेडेकर विद्या मंदिर, विष्णूनगर, ठाणे - ४०० ६०२ इथून प्रकाशित केले.